म. ग्रं. सं. ठाणे.
विषय काव्य
ग्रं. क्र. २५६८

# शुभवर्तमान

वसंत आबाजी डहाके

REFBK-0025557
REFBK-0025557

संदर्भ काव्य
२५६८
२५५५७
२८७८८

शुभवर्तमान

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

सूचना :–खाली दिलेल्या तारखेपर्यंत पुस्तक/मासिक परत करावे, तसे न केल्यास घटना नियम क्र. ५ (८) नुसार प्रतिदिनी ५ पैसे जादा वर्गणी भरावी लागेल.

25 MAY 1988
25 MAY 1988
20 JUL 1988
1 FEB 1989
12 OCT 1996
26 OCT 1996
4 NOV 1996
21 DEC 1996
19 MAR 1997

(क्र. मा. पहा)
५०००–११–८६

संदर्भ काव्य
२५६८
२५५५७
२८।७।८८

# शुभवर्तमान

वसंत आबाजी डहाके

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६८
२५५५७
काव्य
शाखा

सूच
तसे
जाद



मौज प्रकाशन गृह





# शुभवर्तमान

वसंत आबाजी डहाके

REFBK-0025557

मौज प्रकाशन : ३४७
पहिली आवृत्ती : नोव्हेंबर १९८७
© १९८७, वसंत आबाजी डहाके

मुखपृष्ठ व रेखाचित्रे :
वसंत आबाजी डहाके

किंमत पस्तीस रुपये

प्रकाशक :
श्री० पु० भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

मुद्रक :
प्र० पु० भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, गिरगाव
मुंबई ४०० ००४

आपली आयुष्यं निष्फळपणे
संपून जात असल्याची
जाणीवही ज्यांना नाही

त्यांना

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६६
क्र. २५५५५





## अनुक्रम

गाणं १
प्रतिवादी १
नखें ५
नटासाठी पार्श्वसूचना ५
मोर्चा ६
जनावर ८
कत्तल ९
त्या संध्याकाळीं समुद्र १०
समुद्र नुसता बघत राहतो १०
क्रांति ११
वनवास ११
यंत्रणा १२
काळोख १३
सरकणारा ढग १४
लोक १४
दहशत १५
मीठ महाग झालं की १६
उंदीर मारण्याचं औषध १६
अमानुष सत्तेचे दिवस १८
वृत्तपत्र १९
कठोर चकाकणारं झुडूप १९
हजार हातांच्या अरण्यांतील २०
रुजवण २१
नव्या सत्रांच्या आरंभीं वर्गातल्या मुलांना उद्देशून २२
शाळेच्या फाटकाजवळ २२
अमिताभ बच्चन २३
समुद्र कोंडून पडलाय २४
वाचकांचा पत्रव्यवहार २५
लोकगीत २५
विचार झाला पाहिजे २६
वगैरे २७
निःशब्द २७
दोर २८
नाटक ३०
श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा किंवा कुणाचाहि खून ३१
गाडा ३२
प्रेत ३२
सत्य ३३
दरवाजा ३४
हत्या ३५
कंटाळा ३६
सनमांजर ३६
व्यर्थ ३७
खिडकीबाहेर ठेवलेल्या या परक्या ३८

शहर : निर्वासित भटक्यासाठी ३९
पाऊस ४०
संध्याकाळीं समुद्रावर ४०
समुद्र अचानक ४१
चौपाटीच्या स्टॉपवर समुद्र ४२
मी डोकं टेकतों ४३
तूं आहेस जमीन ४३
हंस गात आहेत ४४
थरथरत्या तारांचें ४५
सपाट भावहीन चेहरे ४५
तूं ४६
तूं माझ्या कपाळावर ४६
मार्ग ४७
हात ४८
काळा भ्रम ४९
झाडाचं स्वगत ५०
हालचाल ५०
शहर ५१
सोबत ५२
तिसरा अंक ५५
घराचं मौन ५६
झाडानं अंग काढून घेतलं ५७
संबंध ५७
आता या रानांत ५८
घर ५९
डोळे ६०
प्रदेश ६०
मुद्रा ६३
अदृश्य ६४
ईश्वराचा क्रूर चेहरा ६५
देवाचं प्रेत ६६
भट्टी ६७
तपासनीस ६७
मंदिराच्या बाहेर ६८
बुजगावणं ६९
शोध ७०
ओसाड गावाच्या शिवेवर ७१
गिधाड ७१
जागा ७२
चेहरा ७२
निर्णय ७३
संध्याकाळ आहे ७३
खिडकी ७४
दार ७५
हिरव्या टेकडीवरून ७५
चांदण्यांत शुभ्र घोडा ७६
वादळी घोडा ७७
नदीच्या काठानं शुभ्र घोडा ७८
पूर्वज ७८
घर सोडून ७९
निघणं ८०
शिलालेखावरील अक्षर ८१
पडझड ८२
सरतेशेवटी ८२
बाहुलं ८३
बैलाचा मृत्यू ८४
झाड ८५
मेंदू म्हणजे एक थकून गेलेला बैल ८५
निद्राहीन ८६
शून्य स्टेशन ८७

विहीर ८८

सांभाळ ८८

पावसाच्या झाडाखाली ८९

राख ९०

स्थान ९१

पाठीशीं स्मशान घेऊन ९२




शुभवर्तमान



## गाणं

मी म्हणतोंय गाणं
या दुःखी जनावरासाठी
माझ्या खांद्यावर
डोकं टेकून पडलेल्या.
त्याचं दुखरं काळीज
आणि ठणकणारं मस्तक
शांत करणारा एखादा सूर
मी शोधतों आहें
जळत असलेल्या
माझ्या आतड्यांत.

घशांतून निघूं पाहते आहे
दुःखी जनावराची
घुसमटती गुरगूर.

## प्रतिवादी

बेकायदेशीर गोष्टींविषयी मी कांहीच बोलणार नाही.
मी अगदी निक्षून सांगतों की, बेकायदेशीर गोष्टींविषयी
मी कांहीच बोलणार नाही.
आणि तुम्हांला कायदा माहीत नसेल तर
क्षमा केली जाणार नाही. कायदा माहीत नसणें
हा अपराध आहे. आणि त्यावर क्षमा करणें हाहि अपराधच आहे.
मी बेकायदेशीर कांहीच करणार नाही.
तुम्हांला पुस्तक दिलें तर तशी पावती घेईन,
पावती न घेणें अपराध होईल आणि तुम्ही
पुस्तक परत न करणें अपराध होईल.

न्यायालयांत तुम्हांला शिक्षा होईल आणि शिक्षा न देणें
हाहि अपराधच होईल.
तुम्ही मुकाट्याने पैसे घ्या. पावती द्या आणि
मला वाहन चालवण्याचा परवाना द्या.
तुम्ही ही पद्धती बंद केली आहे म्हणतां तर तें
बेकायदेशीर आहे. मी परवाना न घेतांच
वाहन चालवणें बेकायदेशीर आहे.
तुम्ही मला कायद्यांत पकडण्याचा डाव आखतां आहां
म्हणून तुम्ही असें बोलतां आहां.
पण मी कायद्याने वागणारा माणूस आहें.
मी फसणार नाहीं.

कृपा करून माझ्या पुढ्यांतला चहाचा कप
उचलून घ्या. मला तो पितां यायचा नाही.
मला चहा आणणाऱ्याविषयी संशय आहे,
शिवाय आपण माझी पूर्वअनुमती घेतलेली नाही.
पूर्वअनुमतीशिवाय मी कुठलीहि गोष्ट करीत नाही.
मीं तुम्हांलाहि पत्र टाकलें होतें येथे येण्यापूर्वी,
दिवस, वार, तारीख आणि वेळ कळवली होती.
तुमचें पत्र मला मिळालें नाही.
तुम्ही तें पाठवलें असणारच.
माझीं पत्रें अलीकडे तपासलीं जात असावीं.
त्यांतलीं पुष्कळ मला दिलीं जात नाहीत.
माझ्याविरुद्ध पुरावा गोळा करणें सुरू आहे.
माझ्याविषयींच्या गुप्त अहवालांत त्याची नोंद होत आहे.
मी या शहराचा नागरिक असल्याचें पत्र मला
अद्याप मिळालें नाही. तें पाठवलें गेलें आहे
असें मला कळलें आहे.
मला तें लवकर मिळूं नये अशी व्यवस्था केली गेली आहे.
पण मीं माझा अर्ज जपून ठेवलेला आहे
आणि कायद्याप्रमाणे विवक्षित मुदतीच्या आत
मला त्यांचें पत्र मिळालेंच पाहिजे. नाहीतर
तो त्यांचा अपराध होईल.

मीं सर्व बाबतींत निवेदनें दिलेलीं आहेत,
माझ्या तक्रारी आणि अपेक्षा कळवलेल्या आहेत.

माझ्या घरांतल्या दिव्यांचा प्रकाश कमी
करण्यांत आलेला आहे. आणि रस्त्यावर काळोख असतो.
हें पूर्णपणे बेकायदेशीर आहे.
मला वाचन करतां येत नाही, लिहितां येत नाही,
माझ्या विचारस्वातंत्र्याची मी अशी गळचेपी करूं देणार नाही.
तुमच्या कार्यालयांतील विद्युत्-विभागाकडे मीं तक्रार
नोंदवली आहे.
आणि अन्नविभागाला तर मी लवकरच न्यायालयांत
खेचणार आहें. अन्नपदार्थांचा दर्जा खालावत चाललाय,
निकृष्ट खाद्य घेण्यास भाग पाडण्यांत येत आहे
आणि पुष्कळदा पदार्थ संपल्याचें सांगितलें जात आहे.
हा तर मानवहत्येचा अपराध आहे. हळूहळू
पद्धतशीरपणे हत्या करण्याचा पूर्वनियोजित डाव.
अपराध्यांना शासन झालेंच पाहिजे. आणि मी असें न करतां
अत्याचार सहन करीत राहिलों तर तो माझाहि
मोठा अपराधच होईल. शिक्षा सुनावण्यांत येईल
नि चौकांत लोकांसमक्ष गोळ्या घालून ठार केलें जाईल.

असें जर झालें नाही तर तें बेकायदेशीर आहे
असें मी घोषित करीन.
सगळे कायदे बेकायदेशीर आहेत असें म्हणेन.
कारण की कोणताहि कायदा
माझी पूर्वअनुमती घेऊन तयार झालेला नाही.
म्हणून तो माझ्यावर बंधनकारक नाही.
म्हणून मी नागरिकसभेच्या निवडणुकींत
भाग घेत नाही, मतदान करीत नाही.
सगळ्या निवडणुका बेकायदेशीर आहेत.
उमेदवार आणि मतदार बेकायदेशीर आहेत.
मी त्यांना सहकार्य देत नाही, कारण
मला अपराधांत अडकायचें नाही.

मला या शहरांत राहण्याची परवानगी
मिळालेली नाही. चौकशीअधिकारी येऊन गेले.
त्यांच्याजवळच्या यादींत माझें नांव नव्हतें.
त्या अर्थी मी कोणी नाहीच असें ते म्हणाले.
माझें नांव आणि व्यवसाय मीं त्यांना सांगितला
आणि कुठें राहतों तेंहि सांगितलें.
सहसा मी माझें राहण्याचें ठिकाण सांगत नाही.
पण त्यांच्या यादींत तें नव्हतें.
माझें नांव यादींतून कां काढलें हें मी विचारतों आहें.
मी कित्येक वर्षें इथेच राहतों आहें
तरी माझें नांव कां नाही ?
मला खात्री आहे की तुम्ही पद्धतशीरपणे
हें चालवलें आहे.
यादींत नांव नाही, नागरिकत्वाचा अर्ज करून
उत्तर नाही...म्हणजे सर्वत्र तुम्ही
खोडतोड-मोहीम चालवलेली दिसते आहे.
तुम्ही मला वाहन चालवण्याचा परवाना
दिलाच पाहिजे. मी बाहेरचा कोणी नव्हें
किंवा मी नाहींच असेंहि नाही.
मी आहें.
मी माझें कायदेशीर अस्तित्व सिद्ध करून दाखवूं शकतों
—आणि तुमचें बेकायदेशीर.
मीं सर्व पुरावे गोळा केलेले आहेत.
सर्व सूक्ष्म टाचणें माझ्या संग्रहीं आहेत.
तुमच्या सर्व अपराधांची तपशीलवार नोंद माझ्याजवळ आहे.
तुमचे सर्व गोपनीय अहवाल मी प्राप्त केलेले आहेत.
मी माझ्या पुनर्घटित न्यायालयांत तुम्हांला खेचीन.
तुमच्या जघन्य अपराधांना क्षमा नाही.
तसें करणें बेकायदेशीर होईल.
बेकायदेशीर गोष्टींविषयीं मी कांहीच बोलूं इच्छित नाही.

## नखें

आखूड पावलें टाकीत सर्वत्र हिंडणाऱ्या आत्मतृप्त शासकांना
पुरेशी जाणीव नसते
भोवती हळूहळू वाढत जाणाऱ्या कुजबुजीची.

तसे ते सतर्क असतात :
त्यांचे हलके कान कायम टवकारलेले
आणि कावेबाज नजर सतत सावध शोधांत.

ते निश्चिंत असतात तसे :
सर्वत्र असलेली शांतता, त्यांना वाटते, ती
स्वतःच्या दराऱ्याची निर्मिती.

दूर जंगलांत पाचोळादेखील सळसळत नाही;
पण सूक्ष्म कानोसा घेतला तर ऐकूं येऊं शकतो
लहानलहान प्राणी आपलीं नखें घासताहेत
त्याचा आवाज.

## नटासाठीं पार्श्वसूचना

पडदा उघडला जाईल तेव्हा रंगमंचावर काळोख असेल.
तुला त्या काळोखांत चाचपडत चालावं लागेल. मग रंगमंच हळूहळू
उजळत जाईल. तुझ्या चेहऱ्यावर, हातांवर अंधुक पिवळसर उजेड पसरलेला असेल.
रंगमंचामागे कोणीतरी काचेच्या रिकाम्या बाटलींत फुंकर मारील, कोणी
पितळेच्या चकत्या जमिनीवर सांडील. तोपर्यंत तूं चाचपडत रंगमंचाच्या
मध्यावर पोचलेला असशील. तुला नीट चालतां येत नाही आणि मधून मधून जो
ठकठक आवाज येतो आहे, तो तुझ्या एका पायाचा आहे

हें स्थापित झालेलं असेल. तूं उभा असताना तुझी केवढी तरी मोठी सावली मागच्या पांढऱ्या पडद्यावर पडलेली असेल. तूं चाचपडत चालणारा आहेस, तसाच तूं चाचरत, अडखळत बोलणाराहि आहेस. आणि तूं एका ठिकाणी उभा असताना स्थिर राहूं शकत नाहीस, तुझे हात थरथरत असतात
हेंहि दिसेल. तसा तूं मध्यावर उभा असताना आमच्याकडे हळूहळू वळशील
तेव्हा तुला डोळे नाहीत, तर त्या ठिकाणी नुसत्या खाचा आहेत, असं दिसेल.
तूं हळूहळू हात वर करशील आणि याचकाप्रमाणे तुझे तळहात उघडशील. ते थरथरत असतील. आता आसपास कसलाहि आवाज नसेल. तुलाच आता बोलायचं आहे.
तूं ओठ उघडशील, मिटून घेशील, पुन्हा उघडशील. शब्द येत नाहीत, घशांतून अस्पष्ट घरघर निघते आहे, असं जाणवेल. मग तूं हसण्याचा प्रयत्न करशील. चेहरा क्षणभर वेडावाकडा होईल. तुला हसतां येत नाही आहे. मग तूं एकदम जबडा उघडून बोलूं पाहशील. अर्थहीन, कर्कश आवाजाचा एक तुकडा. रंगमंचामागे समूह पुटपुटूं लागेल. ते सामूहिक पुटपुटणं विधिनाट्यासारखं असेल. मग तुझा चेहरा खूपच पिळवटेल आणि जबरीनं काढावा तसा तूं एक शब्द बोलशील. तूं म्हणशील :
"या शतकांत..."
पुढं तुला दुसरा शब्द उच्चारतांच येत नाही. तुझा चेहरा, तुझे दोन्ही हात वेडेवाकडे होत आहेत. तुझ्या छातींत तो शब्द अडकून पडला असावा. वर निघतच नाही. तुझा चेहरा घामानं थबथबून गेलेला असेल. दुसरा शब्द बाहेर येतच नाही. तुझे हात वळवळतील. तूं थकून उभा असशील. मागच्या पडद्यावरची तुझी सावली विरून गेलेली आहे. तिथं एक चेहरा उगवेल. दगडासारखा निर्विकार. मग दुसरा. तिसरा. चवथा. पाचवा. त्यांच्या पापण्या हलत नाहीत. स्थिर नजरेनं ते तुझ्याकडे पाहत आहेत. तुला स्तब्ध करण्यासाठी ते आलेले आहेत.
पण तूं तर स्वतःच स्तब्ध होऊन गेलेला आहेस.
आता तुला बोलायचं आहे. बोल.

## मोर्चा

दुकानं बंद ठेवलेली असतात जवळजवळ सगळींच;
एखाद्या उघड्या किलकिल्या फटींतून
दिसतो एखादा पाय, चष्म्याची काच,

ऐकूं येतं मंद कुजबुजणं आणि अवचित मोठ्यानं हसणं,
आणि कोणत्याहि क्षणीं फट बंद करण्याची सावधगिरी.
मुख्य रस्ता मोकळा सोडलेला असतो सर्वस्वी.
त्यावर विटीदांडू खेळणारीं तीनचार मुलं :
थोडीं अवाजवी दक्ष, विचलित मनाचीं.
शाळा मिटवलेल्या असतात सकाळींच.
केजींतलीं मुलं परततात
घाबऱ्याघाबऱ्या चेहऱ्यानं,
पोचवणाऱ्या रिक्षांमधून लगेच उलटपावलीं;
आणि बसेस एखादा खडा लागल्याचं निमित्त घेऊन
मुकाट गोळा होतात डेपोंत.
सुटीचंच पण ताणलेलं वातावरण
शहरांत दबा धरून बसलेलं.
कान वाट पाहत असतात
गोळीबाराच्या आवाजाची;
हळूहळू सगळेच रस्ते होतात सुनसान रिकामे.
सूर्याच्या हजार तलवारी झळझळतात आकाशांत,
त्यांचे वार चुकवत नाहीसे होतात घाईघाईनं
हेल्मेटधारक गटागटानं,
जोड्यांचा आवाज होऊन शांतता तडकूं नये म्हणून
अलगद पावलं उचलत;
हेल्मेटखालचे चेहरे असतात भुकेनं, जाग्रणानं, थकव्यानं
ठिकठिकाणी उसवलेले
आणि आपल्या हातांत बंदूक नसून
मेलेला सर्प आहे असं वाटून धास्तावलेले, किळसलेले.
रस्ते असतात सर्वस्वी मोकळे आणि अधीर.
एखाद्या भिंतीशी, अपुऱ्या सावलींत
एखादं लंगडं गाढव.
आणखी कुणीच नाही.
मुख्य रस्ता तसाच मोकळा :
त्यावरचीं विटीदांडू खेळणारीं मुलं
निघून गेलेलीं घरोघरीं;
मुख्य रस्ता वाट पाहत असतो

त्यावरून येणाऱ्या मोर्च्याची.
दुपार टळून जाते तरी मोर्चा येत नाही;
घोषणा नाहीत, गोळीबाराचे आवाज नाहीत !
मोर्चा निघणारच नाहीय...
शहर निघतं पिशव्या घेऊन संध्याकाळीं
सामान्य माणसासारखं आणि निःश्वास टाकतं
उद्या निघेल की काय म्हणून...
पुन्हा सगळं पूर्ववत व्हायला लागतं हळूहळू
आणि म्हातारं शहर कडाडून जांभया देऊं लागतं...

## जनावर

हजारों जखमी जनावरांचं रक्त मिसळून वाहत असतं माझ्या रक्तांत,
काठीला उलटं टांगलेल्या ईडिपस-अर्भकांचे शेवटचे निःश्वास माझ्या श्वासांत,
मी किंचाळतों मध्यरात्रीं टाइपरायटरमध्ये :
आता कोसळत जातील सगळीं भ्रष्ट सरकारं आणि उलथून पडतील
भुसभुशीत पायांचीं गगनचुंबी व्यक्तिमत्त्वं, वाऱ्याच्या हलक्याशा झोतानं
उडून जातील चोंदलेल्या नाकांचीं कागदी माणसं...
भयावह स्वप्नाची सावली ढग निघून जावा तशी हळूहळू दूर होते
मनावरून आणि मी क्षणभर शिणलेलं मस्तक टेकवतो अक्षरांच्या खुणांवर.
माझ्या मिटलेल्या डोळ्यांसमोर तरळतो पुन्हा मोडून पडलेला जबडा
आमच्या स्वप्नस्थ राज्याचा आणि मी उठतों. एक एक पाऊल
उचलत खुरीं आलेल्या जनावराप्रमाणं. उतरतों टाइपरायटरच्या
पायऱ्यांवरून खाली खाली...

आता मी झालोंय असं एक जनावर जे छापील कागदांचा शुष्क कडबा
चघळत विसरूं पाहतंय कत्तलीच्या पात्याचं झगझगीत सत्य...

## कत्तल

नरकाची हिरवट काळी झाक असलेलं हें शहर
मला निवडून दिलं गेलंय
आणि मी तें स्वीकारलंय बंद ओठांनी
ललाटरेषेसारखं.

मेंदूंत नखं खुपसून तें बसतं कपाळावर
आणि आपली तीक्ष्ण धारदार चोच खुपसतं भुवईत.
जणू माझी नजर ही अळी आहे
आणि त्याला ती ठार करायचीच आहे.
त्याचं हें चोच खुपसणं मी स्वीकारलंय.

शहर मला सोबत देतं यातनांचं कारंजं :
तें घेऊन मी हिंडतों अनवाणी रस्त्यांवरून, विद्यापीठांतून,
बसमधून, लोकलमधून, गिरण्यांमधून, बाजारपेठांतून
आणि पाहतों नजरांची अमानुष कत्तल
सर्वत्र चाललेली.

कुणीहि मेंदूमधलीं नखं आणि भुवईतली चोच
काढून फेकूं शकत नाही.
जणू स्वीकारलंय सर्वांनीच प्राक्तनासारखं
की आपण आहोंत निव्वळ एक क्षुद्र भक्ष्य
काळसर हिरवट अजस्र पंखांखालचं…

## त्या संध्याकाळीं समुद्र

त्या संध्याकाळीं समुद्र एखाद्या रक्ताळलेल्या
घोड्यासारखा वाटला.
त्याचं मंद कण्हणं मनांत ठेवून
मी वळलों आणि गर्दींत रस्त्यावर आलों
तेव्हा तो मागेमागे येत होता बहुधा.
मी वळून पाहिलं नाही...
बसमध्ये करमत नव्हतं
पुस्तकांच्या दुकानांत करमत नव्हतं
खटाववाडींत करमत नव्हतं
आर्टगॅलरींत करमत नव्हतं.
एखाद्या रक्ताळलेल्या घोड्यासारखा
मी चालत जात होतों गिरगावांतून,
फोर्टमधल्या फूटपाथवर
शोधत होतों माझं करमणं,
त्या प्रत्येक क्षणीं समुद्र होता आसपास
दुःखाचा हळुवार स्वर घेऊन.
मध्येच मी पान घ्यायला थांबलों
आणि वळून पाहिलं,
माझ्या सभोवार—
सबंध महानगरच्च एखाद्या जखमी घोड्याच्या डोळयांसारखं
सर्वत्र...

## समुद्र नुस्ता बघत राहतो

समुद्र नुस्ता बघत राहतो थकलेल्या डोळयांनी
त्याच्या किनाऱ्यावरचं दंगलग्रस्त शहर.
त्याच्या चष्म्यावर बाष्प दाटून आलेलं

म्हणून तो चष्मा काढून हातांत घेतो
आणि दुखऱ्या डोळ्यांनी पाहतो शहराकडे;
लाटांच्या हातांनी
त्याला स्पर्श करायचा आहे
कण्हत्या शहराच्या कपाळाला.
त्याचा पुढे झालेला हात
थरथरतो...
तंबाखूचा रस थुंकून तो विषण्ण हसतो.
हळूहळू काळोख पसरूं लागतो
त्याच्या जर्जर चेहऱ्यावर.

## क्रांति

जनतेची क्रांति यशस्वी झालेली आहे :
अध्यक्षांनी घोषणा केली.

नंतर अध्यक्षांचे खाजगी सचिव
सपाट आवाजांत म्हणाले :
ठीक दोन वाजतां फाशीच्या शिक्षेचा समारंभ होईल.
तरी सर्वांनी वेळेवर उपस्थित राहावें.

## वनवास

वनवासाला निघालीं आहेत सगळीं माणसं :
स्त्रिया, पुरुष, लेकरं, म्हातारीं, तरणीं.
कोणीच मागे राहिलेलं नाही.

दुतर्फा उभे आहेत रायफल घेतलेले सैनिक
वेशीपर्यंत पोचवायला.
वेशीच्या पलीकडे वनं नाहीत;
आहेत जाळलेलीं शेतं, बॉंबस्फोटानं भाजलेली जमीन.

मागे शहरांत ढासळून पडताहेत घरं.
बुलडोझर्सच्या जबड्यांचे आवाज
सोबत करताहेत अजून.

वनवासाला निघालेलीं माणसं
होऊन गेलेलीं आहेत साऱ्याच शोषणांतून मुक्त.

## यंत्रणा

सहज म्हणून साप्ताहिक उघडलं तर
मधलीं चारसहा पानं फाडलेलीं.
हें काय म्हणून विक्रेत्याकडे पाहिलं
तर त्याच्या कपाळावर आठ्या.
दृष्टि दूर कुठेतरी रोखून तो म्हणाला :
पाहिजे असेल तर घ्या...आणि दुसरी प्रत
शिल्लक नाही आता,
आणि फार काळ इथे रेंगाळूं नका,
धंद्याची वेळ आहे.
दुसऱ्या दुकानांत गेलों.
त्याच साप्ताहिकाची एक प्रत मागितली
तर तिथेहि मधलीं चारसहा पानं फाडलेलीं
आणि विक्रेत्याच्या कपाळावर आठ्या वगैरे सगळंच.
मग शोधत शोधत साप्ताहिकाच्या कचेरींत गेलों.
तिथे कळलं की विक्रेत्यांचा कांहीच दोष नाही;

सगळ्याच प्रतींमधलीं तीं चारसहा पानं गायब आहेत.
तर हें अद्भुत कसं काय...
तर ते म्हणाले : आम्हांलाहि कोडंच आहे.
छपाई तर साऱ्याच पृष्ठांची झाली होती वाटतं.
मग कटिंग मशीन म्हणा किंवा स्टिचिंग...
तर म्हणालों : यंत्रालाहि पचणार नाही असा कांही
मजकूर होता का ?
एवढ्यांत कार्यालयांतून एक जण एक प्रत घेऊन आला
अन् म्हणाला : हे बघा, यांत सगळीं पानं आहेत.
मी घाईघाईनं उघडून पाहिलं तर मधलीं
चारसहा पानं शिल्लक आहेत,
पण त्यांवर मजकुराची एक ओळ नाही.
नुस्तींच कोरीं पानं.
म्हणजे छपाईच्या यंत्रालाहि...

## काळोख

तर डोळ्यांसमोर काळोख.
एकाएकी दिव्यांना काय झालं,
सारं शहर काळोखांत बुडालेलं.
आणि आश्चर्यच आहे एकेक,
कसलाहि आवाज नाही ऐकूं येत;
शहराची जीभच कुणी उखडून काढावी
अशी शांतता.

कांहीतरी आपल्यांतच चुकलेलं आहे—
मी मनाशीं म्हणालों.
अरे, कुणी आहे का : मी ओरडलों काळोखांत.
पण माझ्या ओरडण्याचा आवाज

मलाहि ऐकूं येईना.
जणू माझ्या आवाजासह
शहर कुठे दूर निघून गेलंय...

## सरकणारा ढग

हात वर करा : सर्वांनी हात वर केले
गुडघे टेका : सर्वांनी गुडघे टेकले
भुईला नाक लावा : सर्वांनी भुईला नाकं लावलीं

मग तो मागं वळून सशस्त्र तुकडीला म्हणाला :
शूट करा

मग सशस्त्र तुकडीनं फायरिंग केलं :
बंदुकांमधून गोळ्यांचा वर्षाव व्हायचा
तर पाण्याच्या धारा निघाल्या
भुईला लावलेलीं नाकं चिखलांत रुतलीं
हातांतल्या बंदुका खाली टाकून
शस्त्रसज्ज तुकडीनं त्याच्याकडे पाहिलं तर तो
ढग बनून वाऱ्यावर सरकूं लागला होता...

## लोक

लोक नुस्ते कुरकुरत राहतात, अंधाऱ्या आडोशांत दडून.
करत कांहीच नाहीत.
काळोखांत त्यांचे पांढरे चेहरे
काळवंडत जातात अधिकाधिक.

असहाय बघे.
राजकीय नाटकाचा
मुसक्या बांधलेला प्रेक्षकवृंद.
सरकारं निव्वळ कोसळत असतात प्रेतांसारखीं
आपल्याच पायांपाशीं.

आता कवितेंत आकार घेऊं लागलेलीं सरकारंदेखील
विघटित होऊं लागलीं आहेत
या असाध्य व्याधिग्रस्त शतकांत.

लोक स्तब्ध असतात
कोऱ्या कागदासारखे.

## दहशत

शहर कुंद होऊं लागलंय,
दुकानं घाईघाईनं बंद होतायत
आणि भूक फार लागलेली.

शहराच्या दूरच्या भागांतून येणाऱ्या
जवळजवळ रिकाम्या बसेस, जाळ्या लावलेल्या.

किलकिल्या दारांतून हॉटेलांत शिरलों.
लवकरच सारं लुटलं जाईल अशी भीती
वेटर्सच्या चेहऱ्यांवर.
आणि बकाबका गिळून पळत चाललेले लोक.

अचानक दहशत भरून आली काट्याचमच्यांतून
प्लेटभर.
आणि मी ओढतच उठलों गर्भवती बायकोला
हॉटेलांतून बाहेर.

रस्त्यावर कांहीच नाही आहे.

## मीठ महाग झालं की

मीठ महाग झालं की स्वस्ताई येते :
गांवढळ माणसं मनोराज्यांत गर्क आहेत.
दंडुक्यांच्या ढगांनी भरून गेलं आहे
त्यांच्या माथ्यावरचं आकांक्षांचं आभाळ,
आणि पाठीवर वळांचा पाऊस.
खुरच्या पायांचे कमावलेल्या कातड्याचे व्याख्याते,
शासनाच्या वाऱ्याची दिशा पाहणारे,
रोज वाचतात सकाळींसकाळीं गोळीबारांचे बळी
आणि खुपसतात निर्ममपणे काटेरी चमचा ब्रेडच्या तुकड्यांत.
माझा देश हळूहळू मालवत चाललाय
भयंकर अपराधांच्या टाचांखाली.

## उंदीर मारण्याचं औषध

उंदीर मारण्याचं औषध आहे का
तर, नाही, दुकानदार म्हणाला,
आजकाल आम्ही ठेवीत नाही :

परवाना-फी पुष्कळ अन् बाटल्या खपणार दोनचार.
तर ॲस्प्रो द्या दोन म्हणालों
नि पायऱ्या उतरून चालायला लागलों.
मग मी उंदीर पकडण्याचा पिंजरा विकत घेतला
नि घरीं आलों.
प्रथम मुलीला आत टाकलं,
मग बायकोला ढकललं,
नंतर मी आत जाऊन बसलों.
चला, आता बाहेर जाण्याचं भय नाही.
आत येता आलं पण बाहेर जाण्याचा रस्ता बंदच.
म्हणजे संकटच टळलं.
आता आत सुखाने राहावं
म्हणून सुखाने राहावयाच्या गोष्टी केल्या;
म्हणजे हात बांधून घेणं
तोंडावरून कापड गुंडाळणं वगैरे.

दूर काळोखांत एक जथा पुढे सरकतांना दिसतो आहे :
तो या पिंजऱ्याच्याच रोखाने येतोय...

आता वेढला गेला आहे पिंजरा चारहि बाजूंनी.
ते आत येणार
की बाहेरच राहणार आहेत?

# अमानुष सत्तेचे दिवस

अमानुष सत्तेचे दिवस आता जवळजवळ
संपुष्टांत आलेले आहेत :
जमलेला दाट लोकसमूह गुणगुणतोय
पिवळ्या चेहऱ्यांचा.
त्यांचे विटके पोषाख
चमत्कारिकपणे लहरतात.
नंतर काळोख पसरतो
अशक्त शरीरं चिरडून टाकणारा.

मी सावधपणे दार बंद करतों, कडी घालतों
आणि नाटकांतील पात्राचे कपडे उतरतों अंगावरून.
माझ्या हातांतील मातीच्या खुज्यांतून गावठी दारूचे
घोट घेतों जळत जाणारे. हळूहळू
जाड दोरखंडाच्या वेटोळ्याप्रमाणे विचार
आवळले जातात मेंदूभोवती.

मी छोटीं छोटीं पुस्तकं लिहिणारा,
शांतताप्रिय;
माझ्या मनांत पावलांचा आवाज ऐकूं येतोय
पण पायऱ्या उतरतांना मात्र
कोणीच दिसत नाही.

मी गोंधळून गेलोंय
आणि सरड्याप्रमाणें जीभ लवलवत
काळोख जवळ जवळ येतोय...
मी खिडकी उघडतों आणि डोकावून पाहतों :
बाहेर रस्त्यावरून काळोखांत
रोरावत जाताहेत काळ्या गाड्या.
त्यांच्या कर्ण्यांचा कर्कश आवाज
अमानुष...

## वृत्तपत्र

मी गेल्या वर्षभरांत
नको इतकीं वृत्तपत्रं वाचलीं.
मग माझ्या मनांतच एक
न्यूज बुलेटिन सुरू झालं.
इतके ठार. तितके जखमी.
गोळीबार. बाँबहल्ले. असं रोजच.
मग एकदा असं छापून आलं :
जनतेचा गोळीबार. पोलीस ठार.
सरकार भयभीत.

मग मी कागदाचा कोटा संपलाय
असं जाहीर केलं
आणि तें वृत्तपत्र बंद करून टाकलं.
तरी छापखान्यातलीं कूट यंत्रं
तशीच कर्कश धडधडत राहिलीं.

## कठोर चकाकणारं झुडूप

कठोर चकाकणारं झुडूप :
लोखंडी पत्र्यासारखीं कडक पानं,
त्यांवरच्या तीक्ष्ण रेषा.
झुडुपामागे जमिनींतून वर उचललेला चेहरा
मळलेला, हताश.

मोडकळीस आलेले योद्धे
शिरस्त्राणांचं ओझं,
चिलखतांचं वजन

सावरीत परस्परांना उभे आहेत.
कांही गळून पडले आधार देतां देतां
कुठलीहि लढाई न लढतां.

दूरवर रानटी कुत्रीं
थांबलीं आहेत शांतपणे.

## हजार हातांच्या अरण्यांतील

हजार हातांच्या अरण्यांतील एका वळणावरून
एक जीव चालत येतो हातांवर :
हातांचे पंजे आणि गुडघ्यांच्या वाट्यांवर बळ देऊन
चालत येतो आणि आपला एक हात पुढे करतो
दुसऱ्या हातावर शरीर तोलून.

दुसऱ्या वळणावरून, तिसऱ्या वळणावरून, चवथ्या वळणावरून
एक, दोन, तीन, अनेक जीव चालत येतात हातांवर,
हजारो जीव चालत येतात गुडघ्यांच्या वाट्यांवर बळ देऊन.

त्या जमावासमोर असतो त्यांचा प्रेषित,
हातांच्या पंजावर आणि गुडघ्यांच्या वाट्यांवर चालत आलेला
त्याच्या पडजीभ नसलेल्या तोंडातून निघत असतात
निव्वळ दुर्बोध आवाज.

## रुजवण

मग तिने दारोदार झाडांची भीक मागितली.
जमिनींत तिच्या हातांचें आणि काळजाचें पाणी होतें.
झाडें तरारणार होतींच त्याप्रमाणे मस्त तरारून आलीं :
कोमल पाकळ्यांचीं, उठावदार रंगांचीं—
तिच्या काळजांतूनच बाहेर आलेलीं फुलें;
सायंकालीन प्रकाशांत वाऱ्यावर लहरणारीं,
स्वप्नांतहि सतारीच्या तारांसारखीं कंप पावणारीं.
इथपर्यंत सगळें ठीक होतें.

मध्ये एक रात्र गेली

सकाळीं सारा गाव जागा होईल
एवढा बोभाटा तिने केला.
प्रत्येक रोपावर वनस्पतिभक्षक, कुरूप, केसाळ कीटक.
कुरतडलेलीं फुलांचीं प्रेतें.
विवर्ण होऊन गेलेला तिचा चेहरा
हळूहळू बदलत गेला.
इथूनच तिच्या उद्यानस्वप्नाला वेगळें वळण लागत गेलें.
सारा शोक आवरून कीटकनाशक तिने हातीं घेतलें.

या कथेला शेवट नाही.

जेव्हा आपण एखादें रोप लावतों,
तेव्हा त्याचा शेवट फूल धरण्यांत होत नाही,
आपण अंतहीन संघर्षच रुजवत असतों,
हें तिला आता कळून चुकलेलें आहे.

## नव्या सत्राच्या आरंभीं वर्गातल्या मुलांना उद्देशून

आता आमच्याकडून कांही व्हायचं नाही.
आम्ही असेतसेच वाया गेलों पुरते.
शेतातल्या बुजगावण्यासारखं नुस्तं उंच मान करून
भयावह हसण्यासाठी तोंड वासून राहणं, एवढंच उरलंय,
ज्याला अर्थातच काल जन्मलेलं पाखरूहि
दचकत नाही.
वाऱ्यावर फडफडणारी सदऱ्याची पोकळ बाही
आणि मस्तक म्हणून ठेवलेल्या फुटक्या मडक्याची पोकळी,
मिळवलं असेल तर तें एवढंच, जर हें मिळवणं असेल,
आणि त्याविषयी सुख की दुःख असलंहि कांही आता कळणं कठीण...
आता आमच्याकडून तुम्हांला देतां येण्यासारखं हेंच :
घ्या आणि पुढं पाहा,
टाळतां येईल तर टाळा, असं बुजगावणं होणं...

बाहेर येण्याआधी वर्गांतून
मी पाहिलं सहज वळून मागे :
जुनाट लाकडी खुर्च्या-डेस्कांच्या रांगांपलीकडे, टेबलामागे
हसतंय एक बुजगावणं...

## शाळेच्या फाटकाजवळ

शाळेच्या फाटकाजवळ तिला सोडतांना म्हणालों :
खूष राहा.
ती कसनुसं हसली आणि मानेनंच हो म्हणाली,
म्हणून मी सुटलों.
तिनं विचारलं असतं की खूष म्हणजे कसं,
तर काय सांगतां आलं असतं...
ती वळली आणि फाटकापासून दूर जाऊ लागली,

धरत मागं वळून न पाहतां.
तिला तसं जातांना पाहत असतांना
मी थरारून गेलों नखशिखान्त
रोजच्या जीवनांत लपूनछपून वावरणाऱ्या भीतीला पाहून.

## अमिताभ बच्चन

माझ्या सहा वर्षे वयाच्या मुलीचा हात हातांत घेऊन
मी पाहतों तुझं पडदाभर असणं, हसणं, नाचणं, गाणं.
तुझं या जगण्याविषयीचं विद्रोही बोलणं, वागणं.
जें जगणं माझ्याहि फारसं आवडीचं नाही.
आणि तें न आवडणं मी म्यान करून ठेवलंय आता.
मला एक जाणवत असतं : ती पडद्यांतून तुझ्या विश्वांत
सहज शिरलेली आहे, जसा तूं दुष्मनांच्या गल्लींत
सहजतेने वावरत असतोस, आणि मी खूपच अलीकडे
थिएटरमधल्या खुर्चीतच असतों
गंजलेलं म्यान हातात धरून.
मधूनच माझ्या पिढीच्या शब्दांची थरारती आठवण व्हावी
असं क्षणभर तुझं वागणं, क्षणभरच. समोर असते
तुझे संवाद तुझे ओठ हलण्याआधीच उच्चारणारी उद्याची पिढी.
जणू तूं कापणी करणारा आहेस
आणि उद्याच्या पिढीचा पहिला बहर तुझ्या खळ्यांत.
तुझ्या जिवावर उठणाऱ्या घटनांनी
माझी मुलगी व्याकूळ होते, तेव्हा
माझ्या धीर देणाऱ्या शब्दांत तिला न कळणाऱ्या
वास्तवाची जाणीव असते.
त्यांत खरें तर कांही अर्थहि नसतो.
ती स्वतःची स्वतःच सावरते कांही वेळाने
—जसें तिला पुढे पुष्कळदा करायचें आहे
आणि त्या वेळीं तूं खूपच मागे राहून गेलेला असशील.

## समुद्र कोंडून पडलाय

समुद्र कोंडून पडलाय गगनचुंबी इमारतींच्या गजांआड.
तो संत्रस्त वाटतो संध्याकाळीं : पिंजारलेली दाढी, झिंज्या.
हताशपणे पाहत असतो समोरच्या बत्तिसाव्या मजल्यावरील मुलाकडे,
ज्याचं बालपण उंचच उंच पण अरुंद झालंय
आणि त्याची त्याला कल्पनाच नाही.
समुद्राच्या डोळ्यांत थकव्याचं आभाळ उतरत येतं
आणि शिणून तो वळवतो डोळे.
इमारतींच्या पलीकडच्या रस्त्यावर थकलेल्या माणसांचे पाय, बसचीं चाकं.

समुद्र अस्वस्थ होऊन जातो
शहराच्या आयुष्याच्या विचाराने.
तेव्हा तो मनांतल्या मनांतच मुक्त होऊन फिरूं लागतो
शहरांतल्या रस्त्यांवरून, वस्त्यांमधून.
उशिरापर्यंत रात्रीं तो बसलेला असतो
स्टेशनवरल्या बाकावर एकाकी, समोरच्या रुळांवरील रहदारी पाहत,
हातांवर डोकं ठेवून अर्धमिटल्या डोळ्यांनी.
त्याला आठवतं त्याच्याच शेजारीं
पाय मुडपून कसंबसं झोपलेलं एखादं मूल,
ज्याचं बालपण स्टेशनवरल्या बाकाएवढं,
आणि त्याची त्याला कल्पना असावी किंवा नसावी.
समुद्र खिन्न हसतो आणि शिणलेल्या पापण्या मिटून घेतो.
त्याला काळजी वाटते साऱ्यांच्याच बालपणाची
वयस्कांच्या शहरांतील.

## वाचकांचा पत्रव्यवहार

आपल्या वृत्तपत्रांतून काही दिवसांपूर्वी आम्ही
आमच्या गांवांत उंदरांचा सुळसुळाट झाल्याचें लिहिलें होतें,
तें बहुतेकांस स्मरत असेलच. त्या भयावह स्थितींत उंदरांनी
अक्षरशः पिच्छा पुरवला होता आणि आमची पाण्याऐवजी
बंदुकांचे परवाने मागण्यापर्यंत मजल गेली होती.
आता पाणीपुरवठ्यांत सुधारणा झाली नाही वा बंदुकांचे
परवानेहि मिळाले नाहीत, हा भाग वेगळा.
तेव्हा एका वाचकाने गाव सोडून जाण्याचा सल्ला दिला होता.
त्यावर दुसऱ्या एका वाचकाने, तें गाव जिथे आम्ही जाऊन राहूं शकूं,
तें दुसरें गाव आहे का कुठे, असा प्रश्नहि विचारला होता. असो.
तर आता हे उंदीर पळून जात आहेत. स्वतःच्या खुषीने,
कोणीही हाकत नसतांना ते निघून जात आहेत.
येतांना त्यांच्या झुंडी आल्या; आता जातांना ते
एकामागोमाग एक असे पण वेगाने, घाईघाईने निघून जात आहेत.
कुरतडलेल्या वस्तू तशाच अर्धवट कुरतडलेल्या ठेवून
भयंकर घाबरल्यासारखे पळून जात आहेत.
तर हे उंदीर असे अत्यंत त्वरेने का निघून जात आहेत,
आणि कोठे निघून जात आहेत.
तेथे आम्हीहि जावें काय की येथेच राहावें, आम्हीहि
घाबरावें असें कांही येथे घडायचें आहे काय...
जगणें तसेंच अर्धवट कुरतडून आम्हीहि एकामागोमाग एक असें
पळत सुटायचें आहे काय...

## लोकगीत

जंगलांत जावं तर तिला भय वाटतं वाघाचं, बिबट्याचं;
डोंगरावर जावं तर तिला भय वाटतं अस्वलाचं, लांडग्याचं;

नदीवर जावं तर तिला भय वाटतं मगरीचं, सुसरीचं;
रानांत, वावराशेतांत जावं तर तिला भय वाटतं विंचवाचं, सापाचं;
घरापासून दूर जावं तर तिला भय वाटतं जंगली मांजराचं;
झोपडीत तिचं तान्हुलं एकलंच आहे आणि शेजारच्या आजीला
तर दिसत नाही;
घरीच राहावं तर बायामाणसं कोणी नाहीत वस्तींत
अन् हाक मारावी तर रान आहे दूर...

म्हणून ती म्हणते मला : माझ्या सख्ख्या मोठ्या भावा,
ही कोयती घे अन् घाल घाव मानेवर,
माझ्या अन् या लेकराच्याहि...

## विचार झाला पाहिजे

खेडीं उद्‌ध्वस्त होतात याचा विचार झाला पाहिजे.
शहरं सुजत जातात याचा विचार झाला पाहिजे.
हें कुरूप महानगर कसं उडवून द्यायचं याचा विचार झाला पाहिजे.
नरकाचं जगणं जगायला लागतं अशा झोपडपट्ट्या जाळायच्या कशा
याचा विचार झाला पाहिजे.
कष्टकऱ्यांच्या यातनांची चेष्टा करणाऱ्या पंचतारांकित हॉटेल्सच्या पायांत
सुरुंग कसे पेरायचे याचा विचार झाला पाहिजे.
मुलांचं खेळण्याचं मैदान बळकावून आपल्याच पैशांच्या मस्तींत
आकाशाला खिशांत टाकणाऱ्या स्कायस्क्रेपर्सचीं मुंडकीं
छाटायचीं कशीं याचा विचार झाला पाहिजे.

हळूहळू विचार कशाकशाचा झाला पाहिजे आठवतां आठवतां
मस्तक चकरायला लागतं याचा विचार झाला पाहिजे.
विचार करणं थांबवायचं कसं याचा विचार झाला पाहिजे.
कुठली दवा, कुठली दारू विचार उगवूं देणार नाही

आणि घाण्याच्या बैलासारखं जगतां येईल
याचा विचार झाला पाहिजे.

विचारच विचाराला कापणार आहे याचा विचार झाला पाहिजे.
खायला भाकर, पांघरायला एक चादर, कधीमधी पाहायला
आकाशाचा एक निळाभोर तुकडा याचा विचार झाला पाहिजे.
माणसाला माणसाचं जगणं जगतां येईल याचा विचार झाला पाहिजे.

## वगैरे

कांहीच कसं सुखाचं नसतं.
काय.
सगळंच. आपलं आयुष्य.

कांही नाही रे...
थकवूं नकोस.

मग ती थोडा वेळ सुन्न. किंवा कोणताही विचार.
विजेचं बील कुठे ठेवलंस वगैरे.

## निःशब्द

संध्याकाळ असते नेहमीचीच कामावरून घरीं परत आल्याची,
थकलेली, एकमेकांचं होऊन राहण्याची,
साध्या स्पर्शानं सुखदुःख जाणण्याची.
संध्याकाळ हळूहळू उतरत जाते अंगणांतल्या फुलांवर,
दोघांवर.

जाणवते एकाएकी तिच्या शरीराची थरथर,
आंतल्याआंत मुसमुसून रडावं, तसं काही.
'काय झालं ग ?'
'कांही नाही.'
ओसाडींतून हाक यावी आणि पुन्हा डोळ्यांसमोर
विस्तीर्ण ओसाड जमीन.
केसांवरून, पाठीवरून फिरवतों हात; स्पर्शानं
वेचूं इच्छितों तिच्या मनांतलं दुःख;
निःशब्द जवळतेंत तिचं मन मोकळं करूं इच्छितों.
'अशा या जगांत
कसं आणायचं आपल्या मुलाला.
किती एकाकी असेल आणि आपण कोणीच नसूं.
या हत्या, हे क्रमाक्रमानं नष्ट होत जाणं...
कोणतं जग आपण देणार आहोंत त्याला...'

संध्याकाळ भयंकर वेगानं कोसळते.
या हजारों वर्षांपूर्वीच्या प्रचंड, सरपटणाऱ्या प्राण्यासारख्या शहरावर
संध्याकाळ प्रचंडपणे कोसळते.

## दोर

मरणाच्या इच्छेनं पछाडलेल्या या वर्तमानांत
मी तुला म्हणतों की माझं तुझ्यावर प्रेम आहे,
तेव्हा ते शब्द किती निरर्थक असतात.
एखादा अवाढव्य दगड वरून कोसळतो आहे,
हें दिसत असताना
आपला दुबळा हात उंचावून 'थांब' म्हणण्यासारखं :
इतकं निरर्थक, दुसरं कांहीही नसतं.
भोवती माणसं एकेक करून निरर्थकपणे कोसळत असताना

तुझ्यामाझ्यामधला महत्त्वाचा प्रश्न
अगदी क्षुद्र ठरतो,
आणि आपणहिं क्रमाक्रमानं क्षुद्रच ठरत जातों लहान लहान इच्छांमुळे.
त्या पूर्ण झाल्या नाहीत, तरीहि.
तुझा हात हातांत घेणं ही घटना आता बिनमहत्त्वाची ठरत चाललीय,
माणसं एकमेकांना परकी होत जाताना.
प्रत्येक जण एकाकी असतो आणि एकाकी करीत जातो इतरांना
जखमी पशूप्रमाणे.
या खिन्न निराश देशाच्या वर्तमानांत
प्रेम एक प्रखर राजकीय कृति ठरण्याऐवजी
बौद्धिक मूढता ठरते आणि घाव सहन करणारीं माणसं
बोथट भाषेंत व्यापारी मनोगतं उच्चारत राहतात.
सगळा समोरचा काळच आपल्या हेतूंमध्ये माती कालवत राहतो
आणि आपल्याला ओळखता येत नाहीत त्याच्या दृष्टींतील फेरबदल.
माणसांच्या पाठीवर हट्टी म्हाताऱ्यासारखा हा काळ चढलाय
आणि त्यांना वाटतंय की हीच आहे मिळकत,
हें पाठीला आलेलं कुबड.
म्हणून मी तुला स्पर्श करतों आणि नाकारतों ही भोवतालची
वेढून टाकणारी किळस.
मी तुझ्यावर प्रेम करतों, त्या वेळी मी घोर निषेध करीत असतों
सार्वजनिक हत्यांचा, शारीरिक आणि मानसिक.
मी जाहीर करीत असतों, की मी आहें आणि तूं आहेस.
मी तुझा हात हातांत घेतों
आणि मोकळे करतो माझेतुझे श्वास.
आता माझ्यातुझ्याजवळ असलेलं एकुलतं एक हत्यारच
आपल्याला जखडून असलेल्या मरणेच्छेचे दोर कापूं शकेल.

## नाटक

एक विरंगुळा म्हणून हें नाटक केलं जातंय
आणि काम करणारी नटमंडळी म्हणजे हींच
अपंग बिचारीं, आंधळीं लंगडीं लुळीं बहिरीं मुकीं...तेवढाच आनंद.
यांतल्या गारद्यांचीं कामं करणारीं आहेत मुकीं व बहिरीं
आणि श्रीमंत नारायणरावांचं काम करणारा नट
आहे एका पायानं अधू आणि शिवाय तोतरा. तसं त्याला
बोलायचं काम फारसं नाहीच म्हणा.
ते पहा, रंगमंचावर गूढ उजेडांत निर्विकार चेहऱ्याचे गारदी
येत आहेत दबत दबत
आणि त्यांच्या पुठ्ठयाच्या समशेरी चमकत आहेत चमकीच्या कागदामुळं.
आणि हा नारायणराव, एका पायानं अधू, शिवाय तोतरा.
गारद्यांनी घेरलं त्याला वर्तुळाकार कडं करून;
मध्ये नारायणराव.
एक पाय ओढत पळूं पाहतोय तो
आणि त्याची जीभ वळत नाही आहे आकांतानं हाका मारण्यासाठी.
गारद्यांचे चेहरे बदलत आहेत, अरे,
अमानुष क्रूर होत चालले आहेत. वाटतं की,
पुठ्ठयाच्या तलवारी फेकून हातानंच गळा आवळतील ते
त्या तोतऱ्या नारायणाचा.
नारायण पळूं पाहातोय जीव खाऊन. अरे पळ.
तो ओरडतोय : हाक उमटतच नाही, नुस्ताच तोतरा आकांत.
आता विंगेतून ज्यानं डोकं बाहेर काढलं, तो राघोबा
थोटा आहे...हातच नाहीत

## श्रीमंत नारायणराव पेशवे यांचा किंवा कुणाचाहि खून

वरें झालें. त्यांनी त्या दिवाणखान्याचें दार बंद करून टाकलें.

गारदी येताहेत; आनंदीबाई, त्यांना आवरा.
त्यांचे क्रूर चेहरे आणि तळपत्या समशेरी...
आनंदीबाई, त्या समशेरी म्यान करायला सांगा.

त्या कोपऱ्यांत तीं माणसं कोण आहेत, कुजबूज करणारीं ?
कसलीं गुत खलवतं करताहेत तीं ? त्यांचे डोळे चकाकताहेत.
आणि या कोपऱ्यांत तें कोण दडलं आहे, आणि त्या
जिन्याच्या वळणावर...
वाड्यांत अंधार झालाय, अरे, कुणीतरी समया उजळा.

ही अशुभ स्तब्धता...वाड्यांत कुणाचा मृत्यु झालाय की काय...
आनंदीबाई, ही अशुभ स्तब्धता माझ्यापासून दूर घालवा.
गारदी येताहेत बहुधा :
त्यांच्या पावलांचे आवाज, ते पहा,
जवळ जवळ येत आहेत...

या कुणाच्या हाका
मागेपुढे अवतीभोवती सर्वत्र ?
कोण ऊर फोडून हाक मारतंय ?
दार उघडा, आनंदीबाई, दार उघडा—
गारदी आलेले आहेत, आनंदीबाई, दार उघडा.

तो खरोखर मेला ना ?
तो खरोखर मेला.
मग काका, काका असे शब्द अजून कसे मला ऐकूं येतात ?
तो खरोखर मेला.
नाही, आनंदीबाई, नाही,
तो अजून मेलेला नाही.

आणि अशा जवळ येऊं नका. आधी तो हातांतला खंजीर
दूर फेकून या. मला भीति वाटतेय आनंदीबाई,
तुमच्या डोळ्यांची...

अरे, कुणीतरी समया उजळा, समया...

## गाडा

बापू,
नारायणाच्या शरीराचे ते तसे त्या माडींत तुकडे होऊन पडले असता
तुम्हांला तोंड दाखविण्याचें...
बापू, तुमचा चेहरा असा कां झालाय ? बापू,
तुम्ही असं वेड्यासारखं काय करताय ? सावध व्हा बापू, सावध व्हा.
अरे, कुणीतरी इकडे या.
आधीच आम्हांला असें दुःखांत लोटून आमचा नारायण निघून गेला.
बापू, सावध व्हा, अन्यथा तुमच्या मुसक्या बांधण्यांत येतील.
त्याला नेण्याला स्वर्गांतून विमानें आलीं असतील.
बापू, पेशवाईचे लालचीनें इकडून खून झाला
असा लोकापवाद जर चुकून कानीं पडला तर
विष खाऊन प्राण द्यावा लागेल.
अरे, कोण आहे रे तिकडे ? या बापूंना काढण्या लावा
आणि उजाडतांच तोफेच्या तोंडीं द्या

मी कोठून जिवंत राहिलों, असें मला झालें आहे.
कांही झालें तरी राज्यकारभाराचा गाडा
बंद पाडतां येत नाही...

## प्रेत

एका खुनाचें पिशाच आणखी दहावीस खून करून गाडावें लागतें.
होय, कारण की गादी आणि पेशवाईचीं वस्त्रं
महत्त्वाचीं असतात रयतेच्या प्राणांहून;
तीं मिळवायचीं तर
गारदी पाठवून खून करावे लागतात.

होय बाईसाहेब, तुमचें म्हणणें खरेंच आहे,
पण खवळलेल्या लोकसमुदायाला गाडून टाकणें
तुम्हांला शक्य नाही.

हुकूम काढून ही जीभ येथल्या येथे छाटून टाकाल;
जीभ छाटली तरी नारायणरावांचें प्रेत
गाडून टाकणें शक्य होणार नाही.

फक्त येथे जिभांचा तेवढा खच पडेल.

## सत्य

नाही, बाईसाहेब नाही, दुसरें प्रायश्चित्त नाही.
आपणांसारख्या महापातकी खुन्यांची सोय लावण्याकरितां
ऋषींनी शास्त्रें लिहिलेलीं नाहींत.

तुमची सोय पाहण्यासाठी गुलाम आधुनिक ऋषींचे तांडे
सिद्ध आहेत तुमच्या दाराबाहेर;
पण मी त्यांतला नाहीं.
दक्षिणेच्या लालसेने अर्थ फिरवणारे शास्त्री
तुमच्या माडींत कामावर रुजू झाले असतील.

आता वाड्यांत येण्यापूर्वी मी श्रीमंतांचा नोकर होतों;
या क्षणीं असेन तर सत्याचाच चाकर आहें.
आणि सत्याची भीती तुम्हांला वाटते;
मला ती वाटत नाही.
तुम्ही जीभ छाटून टाकाल सत्य बोललें जाऊं नये म्हणून
आणि तुमच्या स्तुतीचे ढोल वाजवणारा ताफा सज्ज ठेवाल,
सत्य कानीं येऊं नये म्हणून,
पण माझें जिव्हाहीन तोंड मूकतेने बोलत राहील अव्याहत :
सत्यच,
जें दडपून टाकण्यासाठी तुम्ही
आणखी हत्या कराल
आणि त्या हत्यांचे संदर्भ बदलण्यासाठी
नवीं शास्त्रें लिहून घ्याल...

## दरवाजा

काल श्रीमंत जेव्हा येथून गेले, तेव्हा ह्या दरवाज्याकडे पाहून त्यांना वाटलें,
आ पसरलेल्या वाघाप्रमाणे हा दरवाजा
त्यांना खावयास उठला आहे.

त्यांनी मला विचारलें : तुळोजी, तुम्हांला म्हणून विचारतों,
कुठे वाच्यता नसावी,
नारायणराव हिंडत असतो का रात्रींअपरात्रीं वाड्यांतून
अस्वस्थ समंधासारखा...की भासच असावा तसा...
अखेरच्या क्षणीं...खूप तडफड झाली होती का त्याची?...
तुम्ही त्याचे पाय धरून ठेवले होते म्हणून
तुम्हांसच खास करून विचारतों.
आणि...त्या बंद माडींत काल मध्यरात्रीं
कोंडलेल्या वाघाची असावी तशी गुरगूर मीं ऐकली,

तुम्ही कांही ऐकलं का? की तोहि भासच असावा...
नाही, तुळोजी, तो भास नव्हता.
हा पहा...
तुळोजी, हा वाघाचा जबडा प्रथम बंद करा...

प्रत्यक्ष जिवंत वाघासमोर उभे असल्याप्रमाणे
श्रीमंत चळचळा कापत होते.

## हत्या

महादजी, मला शुभ आणि अशुभ
दोनहि सारखींच आहेत.

गारदी माडींत शिरले तेव्हा
बंद दाराबाहेर मी थरथरत उभा होतों.
आतला आकांत दारावर आपटून परत जात होता
आणि माझे हात शेणामेणाचे होऊन गेलेले.
मला ती हत्या थांबवायची होती आणि,
महादजी, थांबवायची नव्हतीहि...
शरीराच्या व्याधी आणि शरीराचे आनंद
यांच्यापलीकडे हें माझें शरीर थांबलें होतें...
त्यांच्यापर्यंत कांही पोचतच नव्हतें.

महादजी, मीच गारदी होतों आणि मीच नारायणराव होतों
आणि माझीच हत्या होत होती...
माझी सतत हत्या होत आहे, महादजी,
सतत कुणीतरी पाय धरून ठेवलेले,
सतत गारद्यांच्या समशेरींचे आघात...

## कंटाळा

मला बरें म्हणणारा जगांत कोणी उरला आहेसें
मला वाटत नाही.

श्रीमंत म्हणून समोर नम्र अभिवादन करणारे नगरजन
पाठ वळतांच मागे घृणा थुंकत असतील.
नजरेसमोर त्यांचे हिडीस चेहरे झळकतात,
त्यांचीं रोखलेलीं बोटें,
आणि स्वतःची शरम वाटूं लागते.
हें डोकें या देहावरून गळून पडलें असतें तर
बरें झालें असतें.
कारण त्यांत नारायणरावाच्या हाकांशिवाय
दुसरें कांहीच नाही;
मस्तकाच्या बंद माडींत जिवाच्या आकांतानें
तडफडणारा नारायणराव.
तो या डोळ्यांत उतरलाय
आणि माझीं बोटें
गारद्यांच्या खुनशी उन्मादाने वळवळताहेत.

मला ह्या सर्व उलाढालींचा कंटाळा आला आहे,
आनंदी...

## रानमांजर

सत्य एखाद्या रानमांजरासारखं गुरगुरत
छातीवर उडी घेतं.
तें चावतं, आपल्या तीक्ष्ण नख्या
घुसवतं खोलवर काळजापर्यंत.
दोन्ही हातांनी आवेगानं उचलून

फेकून द्यावं,
तसं तें आणखी तुटून पडतं,
ओरबाडतं सर्वत्र,
छातीवर, मानेवर, कपाळावर.
सत्य भेदत जातं कपाळांतून
मेंदूंत.
सत्यापासून सुटका नसते :
वाटा बंद झालेल्या
आणि तुम्ही सत्याच्या पकडींत अडकलेले.
आता कपाळांत नख्या घुसवून बसलेलं रानमांजर
तुमचंच आहे.
तुम्ही तें वागवा :
तेवढंच तुमच्या हातीं असतं.

## व्यर्थ

हें जें माझं झगडणं आहे,
तें
व्यर्थ आहे.

भोवती,
खिळ्यांच्या बुटांचं वास्तव
आणि
जिभेवर वेडसर शांतता.

आता, ही जी वेळ आहे,
हात मागं बांधून
डोकं खाली झुकवण्याची,
ती
अटळ आहे.

# खिडकीबाहेर ठेवलेल्या या परक्या

खिडकीबाहेर ठेवलेल्या या परक्या शहराच्या काळजांतील
अस्वस्थ कल्लोळ ऐकत
संध्याकाळीं आम्ही कासावीस होऊन जातों
घराकडच्या आठवणींनी.
आम्ही वावरतों मनांतल्या रस्त्यांवरून
पावसाचा मार चुकवण्यासाठी खाली माना घालून
लगबगीनं जाणाऱ्या गुरांप्रमाणे
आणि अनुभवतों पायांपर्यंत पोचलेलं पुराचं पाणी.

तूं म्हणतेस खिडकींतून बाहेर रस्त्यावर पाहत :
कुणा अदृश्य हातानं फेकून दिल्यासारखं
आयुष्य येऊन पडलंय रुंद रस्त्यांच्या या शहरांत
आणि आमच्या पायांखालचा रस्ता मात्र
पुसून टाकलाय कुणा बोटांनी आमच्या नकळत...

माझे हात चाळवतात क्षणभर आणि पुन्हा ते
मोडल्यासारखे पडून राहतात. असहाय.

बोलण्याच्या साऱ्याच विषयांचीं दारं
बंद झालेलीं असतात
आणि आपण उभे असतों त्यांच्यापुढे हताश,
शिणलेले शब्द घेऊन.

तूं वळतेस खिडकीपासून
तेव्हा मी उठतों आणि बंद करून खिडकी
मिटवतों
बाहेरची हजार जिभा असलेली संध्याकाळ...

## शहर : निर्वासित भटक्यासाठी

शेकडों रस्त्यांचं आहे हें शहर निर्वासित भटक्यासाठी.
बसेसचे, टॅक्स्यांचे रस्ते. सहा मर्यादित, आठ मर्यादित, सहासष्ट क्रमांकाची
बस जाते गिरगावांतून, पंच्याऐंशी वरळीपर्यंत.
वरच्या मजल्यावरून खाली पाहत डबल डेकरच्या उतारू
रांगा लांबच लांब बससाठी दुसऱ्या, तिसऱ्या.
कुठला क्रमांक, कुठलीं चाकं वाहून नेणार आहेत
हें दुखरं अस्तित्व.
रस्ता ओलांडणारीं माणसं, थबकलेलीं वाहनं, थांबा, जा.
गर्दी, माणसंमाणसंमाणसं
सर्वत्र, अवतीभवती
माणसांचे समूह, थवे, जमाव, पुंजके, गट, घोळके. अनोळखी.
माणसांचं जाळं
आणि त्या जाळ्याचा स्वामी अदृश्य कीटक-देव.

चर्चगेट ते दादर, उतरून पश्चिममधून मध्यमध्ये, दादर ते डोंबिवली,
कल्याण ते व्ही० टी० आणि चेंबूर, चुनाभट्टी, चर्नी रोड, सांताक्रूझ, अंधेरी,
होर्डिंग्ज, कावळे, वर्दळलेले, हताश प्लॅटफॉर्म्स, करी रोड, मशीदबंदर...
शेकडो आगगाड्यांतून निरुद्देश भटकूनहि
संपतां संपत नाही हें शहर.

कुठंच थांग लागत नाही शहराचा, त्याच्याभोवतीच्या गढूळ समुद्राचा,
काळजांतील अस्वस्थतेचा, एकाकीपणाचा,
स्वतःचा.

## पाऊस

पुन्हा पाऊस कोसळतोय
शांत आणि स्थिर लयींत.
रात्रभर पावसाचा हा आवाज
स्रवत होता निद्रामय शरीरांत.

पावसाचा आवाज आणि तुझा स्पर्श.

तूं माझ्या बाजूलाच झोपलेली होतीस खरें तर
असें आठवतें आहे;
मग उठून पावसांत केव्हा गेलीस ?
वारा आणि पाऊस तुझ्या केसांत.

मी पांघरुणांतून बाहेर काढावा तसा
स्वप्नांतून हात बाहेर काढतों
आणि तुझा चेहरा चाचपतों.
चेहरा. केस. गळा.

बाहेर पाऊस कोसळतोय.
पावसाचा आवाज
तुझ्या त्वचेच्या आत ऐकूं येतोय.

## संध्याकाळीं समुद्रावर

संध्याकाळीं समुद्रावर गेलों
तेव्हा समुद्र दूर होता :
दुरून दुरून त्याची गाज
मनांतल्या मनांत ऐकत होतों.

संध्याकाळचा विव्हल उजेड
समुद्राच्या पाण्यावर
आणि दुःखी घोडे हळूहळू चालत यावे
तसा लाटांचा हळुवार आवाज...

तूं ओल्सर वाळूचं घर करीत होतीस
एखाद्या लहान मुलीप्रमाणे;
मी कांहीच करीत नव्हतों;
नुस्ता पाहत होतों—समुद्राच्या पलीकडे.

तूं म्हणालीस : हा समुद्र आहे ना
तसा तूं वाजत असतोस सतत
माझ्या मनांत.

समुद्र जो दूर होता
जवळ कधी आला, कळलं नाही.

## समुद्र अचानक

समुद्र अचानक काळोख होऊन
पसरला माझ्यांत आणि तुझा हात
माझ्या हातांत नव्हता.

तूं समुद्राहून परकी.
तुला कळल्या काळोखांत वाजणाऱ्या लाटा ?
त्यांतला आकांत ?

दोन्ही किनाऱ्यांवर तुझा निर्मम चेहरा,
समुद्राच्या आणि माझ्या मनांतल्या समुद्राच्या,

उद्‌ध्वस्ततेचा स्वर भरून राहिलेला समुद्रभर.

तेव्हा समुद्राचाच कोमल हात
अंधारांतून पुढे आला.
तो हात तुझाच तर नव्हता ?

## चौपाटीच्या स्टॉपवर समुद्र

चौपाटीच्या स्टॉपवर समुद्र
बसमध्ये चढला आणि माझ्या शेजारीं बसला.
मी ओळखलं नाही त्याला आरंभीं;
त्याचे वाऱ्यावर भुरुभुरू उडणारे केस
आणि यातनेनं गहिरे झालेले डोळे
चुटपुटते दिसले.
एक स्तब्ध अस्तित्व आपल्या शेजारीं आहे,
मुंबईतल्या माणसांसारखं तिऱ्हाईत,
इतकंच मला भान.
त्याचे ओठ बोलणंच विसरल्यासारखे, हसणंहि.
मग मला जाणवलीं अचानक
मधूनच अस्वस्थ हलणारीं लांब बोटं.
मी ओळखीचं हसणार त्याच्याकडे पाहून
तेवढ्यांत तो उठला,
घाईघाईनं उतरला नरिमन पॉइंटवर.
बस वळली.
माझीं बोटं अस्वस्थ फडफडत राहिलीं
बसच्या खिडकीच्या काचेवर...

## मी डोकं टेकतों

मी डोकं टेकतों
ती उशी तूं असतेस
आणि माझ्या हातांतलं पुस्तक
तूं असतेस
बाहेरचा ओला अंधार
आणि माझ्या खोलींतील मंद स्वरांतलीं गाणीं
तूं असतेस
हा बल्बचा निळ्या भिंतीवरून ओघळणारा शांत उजेड
तूंच असतेस
तूं ही खिडकीतून येणारी वाऱ्याची झुळूक
माझ्या पापण्यांवर टेकलेली झोप
तूं भरतीचं पाणी, काळाचं वारं, सुंदर फुलांचं झाड
अर्धवट गुंगींत एखादं तंतुवाद्य
तूं

## तूं आहेस जमीन

आता मला झोपायचं आहे, गाढ.
तूं आहेस माझी झोप, माझ्या जळत्या डोळ्यांची शांती.
माझं त्रस्त मस्तक सोपवलं आहे ती पाण्यासारखी
नितळ आणि ऊबदार मांडी.
तूं आहेस माझ्या ताणलेल्या नसांसाठी कोवळा स्पर्श :
माझ्या मेंदूमधला गोठलेला थंड काळोख
वितळवून टाकणारीं तुझीं दिव्यांसारखीं बोटं.
तूं आहेस थंड पाण्यांत भिजवलेलं मऊ कापड
माझ्या पेटलेल्या हृदयासाठी.
तूं आहेस मूक आक्रोश करणाऱ्या हाडांसाठी

पातळ पांघरूण.
तू आहेस माझ्या आवडलेल्या जिभेचा शब्द;
माझ्या समग्र हाकेचं उत्तर.
तूं आहेस उग्र अवकाशांत
मुरलीचा स्वर,
भणभणत्या ओसाडींतील लालजर्द फूल.

मी स्वतःला आता
तुझ्यांत सोपवतों आहे :
तूं मला संपव; विझव माझं अस्तित्व,
मालव माझं जळतं आयुष्य.
मी माझं तापलेलं कपाळ
तुझ्या स्तनांवर ठेवतोंय :
त्याच्या कढत स्पर्शानं
तूं तुझ्या प्राणांचं पाऊल मागं घेऊं नकोस.
तूं आहेस जमीन :
मला तुझ्यांत पुरून टाक...

## हंस गात आहेत

हंस गात आहेत मृत्युसमयीचें गाणें;
आणि त्यांच्या स्वरांनी
भरून गेलेंय माझें शरीर,
पान न् पान अस्तित्वाचें.

या विलक्षण कातर क्षणीं
उकलतोंय तुझ्या आठवणीची
एकेक पाकळी.

मधोमध तुझ्यामाझ्या
वाहताहेत काळाचे काळे वारे.

## थरथरत्या तारांचें

आणि थरथरत्या तारांचें अजून थोडें
उरलेलें आहे रेंगाळतें संगीत.
दिशांच्या आकृति पुन्हा स्पष्ट होतील...
तेव्हा तूं कोठे असशील ?

लाल गुलाब काळजाचा दुखेल
खुडला जातांना अज्ञात बोटांनी.

जगणेंच तेव्हा ठरेल
साखळदंडांनी जखडलेलें.

आता मी पुन्हा गळणारीं पानें,
विशीर्ण फांद्या.

## सपाट भावहीन चेहरे

सपाट भावहीन चेहरे
उसवून परत शिवलेले :
तुझ्या कानामागून हनुवटीपर्यंत
टाके घातलेले दिसताहेत;
माझ्याहि मस्तकावरची शिवण
तूं पाहते आहेस;
सूर्यसुद्धा परत शिवला गेलाय...

त्याच्या जखमी प्रकाशांत
तुझा एक स्तन उघडा पडलाय
परस्परसंबंधाप्रमाणे.

तुझ्यामाझ्यामध्ये टाके घातलेलं वास्तव
भोवती निर्मनुष्यता...

## तूं

तूं आहेस भूक
आणि तूं आहेस माझं अन्न
तूं आहेस घास आणि जीभ यांतलं अंतर
तूं आहेस कळवळणारीं आतडीं, त्यांचे पीळ
तूं आहेस जठरांतून उठणारा आगीचा लोळ
छातीमधून मस्तकापर्यंत पोचणारा
तूं आहेस मस्तकांतलं चक्रभ्रमण
सूर्याचं
तूं आहेस जाळणारं ऊन आणि
इंद्रियांचे फूत्कार आणि वणवा
तूं आहेस
तूं आहेस
माझं भस्म, माझी राख, माझा अंगारा

## तूं माझ्या कपाळावर

तूं माझ्या कपाळावर हात ठेवतेस
तापलेल्या, जगण्याच्या उन्हानं.
आतल्या पाकळ्यांचा स्पर्श होतोय का तुला,
मी विचारतोंय.
नाही. त्या आता कोमेजताहेत.

तंतु तंतु विखरून पडताहेत,
सबंध देहभर पानं, पानांचे खच.
कुठं कुठं शोधशील
कोळपून टाकणाऱ्या उन्हापासून वाचलेला
जीवभर स्पर्श.
मस्तकांत, छातींत, मांड्यांत,
तळहातांत,
सर्वत्रच नासाडीचा वारा घोंगावतोय.
कुठंहि गेलीस तरी
कोसळणं थांबवतां नाही येणार
तुझ्या वेलीसारख्या वेढणाऱ्या हाताला.

## मार्ग

कांहीच कसं सरळ होत नाही : तूं म्हणालीस.

जमिनीचा असा एक पट्टा की ज्यांत कांहीच उगवत नाही.
आजूबाजूला खूप उगवतं, पण हा कोरडाच. मैलच्या मैल लांब,
निरनिराळ्या शेतांतून, नागमोडी वळणं घेत गेलेला.
नागफंटा. लोककथेंतील महासर्पाचा मार्ग.

आपल्या आयुष्यांतून हा मार्ग गेलेला आहे.
म्हणून, पेरतों पण उगवत नाही कांहीच.
वाया जात राहतं सगळंच.
बोलणं, करणं, वागणं : मी म्हणालों.

तुझा चेहरा तूं वळवलास आणि माझ्याकडे पाहिलंस.
तुझ्या डोळ्यांतून तो मार्ग गेलेला आहे
आणि माझ्याहि डोळ्यांतून गेलेला असेलच.

मी पाहत राहिलों तुझ्याकडे आणि मग
तूं पाहत होतीस त्या रस्त्याकडे, त्या रस्त्यावरच्या माणसांकडे
मी पाहिलं.

त्या सर्वांच्याच आयुष्यांतून हा मार्ग गेलेला असणार,
काळवंडलेल्या चेहऱ्यांच्या, खांदे झुकलेल्या
त्या सामान्यांच्या आयुष्यांतून...

## हात

वळतों, निघून जातों,
पुन्हा परत येतों...
मी पुन्हा पुन्हा परत येतों तुझ्याकडे.
तूं आहेस शहर
या निष्कासितासाठी.
तुझे रस्ते, रूळ, बसेस, गाड्या, घरं, बागा
यांवरचं माझं असणं, राहणं
विसरतां येत नाही मला.
तूं आहेस शहर
ज्याच्या पिसाट रस्त्यांवर
उन्मत्त होऊन धावत असतों मी
मस्तकांतल्या सूर्याच्या ज्वाळांसह
आणि विझवूं पाहतों स्वतःला
तुझ्यांत लहरणाऱ्या समुद्रांत.
मी निघून जाऊं शकत नाही
तुझ्या हद्दीबाहेर.
मी पुन्हा परत येतों,
तुझ्या शिवेवरच्या बंद दाराला
धडक मारतों, आकांत करतों...

घाईनं बंद झालेल्या दारांत
अडकला आहे माझा बाहेर लोटलेला हात...

## काळा भ्रम

तुला काळा भ्रम झालाय :
काळ्या भ्रमराचं हृदय कापणारं गुंजन
तुला ओढ लावतंय;
त्याचा निर्मम, चकाकणारा काळा रंग
तुझ्या डोळ्यांना आंधळं करतोय.
तुला आलेली आहे काळी ग्लानी
काळ्या भ्रमराच्या ज्वरासारख्या स्पर्शानं.

संध्याकाळच्या अंधुक उजेडांत
तुझ्या पाकळ्या थरथरत आहेत;
तुला नष्ट करून टाकणाऱ्या काळ्या भ्रमरासाठी
तूं स्वतःचं मिटून घेणं थांबवलं आहेस.

आता तुझ्या शुभ्र पाकळ्यांवर
उमटत आहे खोल काळेपणा.
काळ्या भ्रमराभोवती साऱ्या पाकळ्या वेढून
तूं अनुभवत आहेस विनाशाच्या यातना,
तुझं कुरतडलं जाणं,
छिन्नविच्छिन्न होणं.

आता तुझ्या जाणीव-नेणिवेच्या पलीकडे आहे
काळ्या भ्रमराचं अलिप्त काळेपण.

## झाडाचं स्वगत

तुझ्या डोळ्यांसमोर एखादं झाड वाळत चाललं असेल
तर तूं काय करशील ?
झाडानंच जर आपलीं मुळं वर ओढून घेतलीं असतील
तर तूं कसं सावरशील ?
कसा थांबवशील विनाशाचा वारा
झाडाला उद्ध्वस्त करणारा ?
कसा घालवशील
साऱ्या रक्तवाहिन्यांत शिरलेला शिशिर ?
कसं अडवशील अगदी तुझ्या डोळ्यांसमोर
तुझ्या पुढ्यांत झाडाचं कोसळणं ?

हें आहे एका कोसळत्या झाडाचं स्वगत
जें माझ्या छातीआंत कुठंतरी होतं, असावं.
त्याचं सळसळणं हल्ली ऐकूं येत नाही म्हणून पाहिलं
तर झाडाचं विझत्या स्वरांतलं हें बोलणं...
तुलासुद्धा ऐकूं येतंय का कांही
की नाहीच
झाड कोसळून पुढ्यांत पडेपर्यंत
तुला ऐकूं येणार नाही कांहीच.

## हालचाल

प्रथम आपला एखादा हात मरून पडावा
आणि हें असं काय झालंय आपल्या हाताचं
असा विचार मेंदूत येत असताना
हातांतलं मरण हळूहळू साऱ्या शरीरभर
पसरत जावं

आणि सगळं शरीरच मरून पडावं
मेंदूंत एक लहानशी ठिणगी कायम ठेवून...

तसं तुझं झालंय.

आता ती ठिणगी विझण्यापूर्वी
मला हालचाल केली पाहिजे.

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
२५६९
२५५५६
२८।४।९९

## शहर

हें शहर तुला अस्वस्थ करून टाकतं :
झोपूं देत नाही की दुखणारीं हाडं
चतकोर जमिनीवर पसरूं देत नाही.
इच्छा अपुऱ्याच राहून मरून गेलेल्या माणसासारखं
हें शहर तुला छळतं.
तुला रस्त्यावरून नीट चालतां येत नाही :
समोरून, मागून, कुठूनहि
अचानकपणे तें तुझ्यावर तुटून पडतं
आणि नाहीसं होतं.
तरीहि तुला वाटत राहतं
की पलीकडच्या वळणावर असेल दबा धरून,
की असेल मागून येत दबत्या पावलांनी.
शहरांतून तुला सुटतां येत नाही
आणि तुझ्यांतून शहर निघत नाही :
खोल गेलेल्या काट्यासारखं तें खुपत राहतं
तुझ्या काळजांत.
तें तुझ्या आत शिरून बसलेलं आहे;
तुला स्वतःच्या हातांनी
तें उचकटून फेकतां येणार नाही.

तुला फक्त शहर सोबत घेऊन जगणं
एवढंच शक्य आहे.

तुझं शहर
मी आहें.

## सोबत

[library stamp]

। १ ।

“समोर का पाहत नाहीस ?
रस्ता अरुंद आहे आणि आजूबाजूला दरी आहे,
म्हणून म्हणतोंय.
मी जर आता तुझा हात घट्ट पकडून ठेवला नसता तर
तूं कोसळली असतीस.
तूं बोलत नाही आहेस.
तूं घसरणार होतीस; कोसळूं दिलं नाही,
म्हणून समोर पाहा म्हणतोंय.”

“तूंहि मघाशी घसरणार होतास.
मी कांही बोलले नाही.”

“तूं कांही म्हणाली नाहीस, हें खरं.
नुस्ता माझा हात हातांत गुंफून घेतलास.
पण मी शिकलोंय.
कोसळण्याची शक्यताच टाळणं
आपल्या हातांत असतं.”

“मी कोसळलें नाही ना ?”

"तूं कोसळण्याची शक्यता विसरून जातेस.
कोसळूं शकणं अनुभवूनहि.
मग मला समोर पाहत चालावं लागतंच.
शिवाय, तूं समोर पाहत चालते आहेस की नाही, हेंहि.
अशांत मीच कोसळण्याची शक्यता असते."

"मग, मला कोसळायचं असलं, तर कोसळूं दे."

"माझ्यासोबत, माझा हात हातांत घेऊन चालत असताना
कोसळूं देऊं..."

।२।

"कसा आहेस तूं, आता?"
"ठीक आहें."
"वाटत नाही."
"मग नसेन."
"किती दिवस असा ठीक नसशील?"
"ठाऊक नाही."
"मला कंटाळा आलाय."
"मी काय म्हणूं?"

"बोल."
"काय बोलूं?"
"कांहीही बोल. तूं बोललीस की बरं वाटतं. स्तब्ध असलीस की
असह्य होतं."
"काय बोलावं, मला कांही कळत नाही."
"मलाही कळत नाही. पण फार एकाकी वाटतं.
आपण एकमेकांच्या जवळ असूनहि, किती एकाकी आहोंत."
"वस्तुस्थिती आहे :
ती आता स्वीकारणं भाग आहे."

"यांतून सुटायचं कसं?"

" मला ठाऊक नाही."
" मलाहि."
" पण सुटावंसं वाटतं. सारखं असं मेलेल्या सापासारखं
पडून राहणं, नको वाटतं."
" आपग मेलेले सापच आहोंत. किंवा मरूं घातलेले.
आपले देह चिरडले गेले. तोंड थोडं बचावलेलं आहे,
म्हणून जिभा वळवळताहेत."

" आपण असे नव्हतों."
" खरं आहे."
" माझ्यामुळंच आपलं असं झालंय, हें तुला म्हणायचं आहे ना ?"
" नाही."
" नाही म्हणूं नकोस."
" नाही. आपलं असं होण्यांत मीहि सामील आहें."
" असं का व्हावं ?"
" कळत नाही."
" एकत्र येण्यांतच एकाकी होण्याचीं बीजं असतील का ?"
" असतीलहि."

" स्तब्ध आहेस."
" हं."
" बोल."
" काय ?"
" कांहीहि. म्हणजे तरी तूं आहेस हें कळत राहील."

। ३ ।

या उंच पांढऱ्या भिंतीपलीकडे तूं असशील.
माझ्याप्रमाणेच भिंतीभिंतीला हात लावत एकाकी चालत.
तुझ्या पावलांचा आवाज ऐकूं येत नाही की तुझा श्वास,
आणि इकडेहि कुणी नाही सोबत : एखादं झाड किंवा तळं.
दूरपर्यंत नुसता उजाड प्रदेश दुभंगलेला या भिंतीनं.

बहुधा, असंच असेल तिकडेहि. आणि तूं ही भिंत कुठं संपते,
पुन्हा भिंत आहे की आपण, म्हणत असशील स्वतःशीच.

## तिसरा अंक

तिसऱ्या अंकांत दुसऱ्या अंकांतील प्रवेश
पुढे चालू...
पहिल्या अंकांत तीं दोघं
हळूहळू वाळूच्या ढिगांतून बाहेर पडून
चालायला लागलीं होतीं.

आता चालतां चालतां ती
त्याच्या बरीच पुढे गेलेली आहे.
तो थांबलेला आहे.
ती मागे वळून पाहते :
वाऱ्याचे झोत
आणि उडणारी वाळू.

दुसऱ्या अंकांत तिनं त्याला हात धरून
बळंबळंच चालवलं होतं.
मग कांही काळ सोबत आणि हळूहळू
त्याचं मागे पडत जाणं.
तो या वाळूंत कोसळेल
आणि वाळू होऊन जाईल.
ती थांबून त्याच्याकडे पाहते आहे.

वाऱ्याच्या झोतांत त्याचं बोलणं
कळत नाही.
मी थांबतों, तूं पुढे जा
असं तो म्हणत असावा बहुधा.

किंवा, तूं माझ्याकडे ये,
माझ्यासोबत वाळू हो.

ती उभीच.
समोर पाहते. मागे, त्याच्याकडे.
ती पुढे जाऊं शकत नाही. मागेहि.
त्याला कवळणारे वाळूचे हात
आता तिच्याकडे झेपावत आहेत.

पडदा पडतो.

## घराचं मौन

घर ठणकतं, दुखतं. प्रत्येक वस्तूंतून
ऐकूं येतं कण्हणं. मूक आणि अविचल.
पसरलेला आकान्त घराच्या मोकळ्या अवकाशांत.
घर अस्वस्थ होतं
त्याच्या पंखांत वावरणाऱ्या जिवांच्या यातनांनी.
दगडी डोळ्यांनी तें पाहत राहतं :
तडफडणारीं शरीरं;
त्यांतले आवेग, उद्वेग;
शरीरांतला शोकाचा जड काळोख.
घर पुटपुटतं मध्यरात्रीं
ओठांतल्या ओठांत.
घराचे ओठ हलतात आणि मिटून जातात.
शरीरांच्या तडफडत्या स्तब्धतेंत
घराचं मौन
विखरून जातं कणकण होऊन.
घराचीं बंद दारं
नेहमीसारखींच असतात अलिप्त,
घराचं घरपण सांभाळत.

## झाडानं अंग काढून घेतलं

झाडानं अंग काढून घेतलं
की सूर्य भाजून काढतो.
मग हें ऊन लागलेलं जगणं घेऊन
उठतां येत नाही
की बसतां येत नाही.
नुस्तंच राहतं भोवंडणं
बाहेर प्रखर उजेड असतांना
आत आंधळं होऊन.

माझं झाड
तूं आहेस...

## संबंध

संबंधांचे मोडके तुकडे पडलेले आहेत तुझ्यामाझ्यामधल्या अंतरांत...
आता इथून मला तुझा चेहरा दिसत नाही.
खिडकीबाहेर ज्या डोंगरांकडे तूं पाहते आहेस ते दूरचे डोंगर
मला दिसताहेत, त्यांच्यावरचं निळं गूढ धुकं आणि तुझ्या खांद्यावर,
केसांवर पडलेला पिवळसर उजेड. मधली एक उंच आणि खूप दूरपर्यंत गेलेली
पांढरी भिंत; त्या भिंतीजवळून चालत जात असलेल्या,
काळीं वस्त्रं पांघरलेल्या भिक्षुणींच्या आकृती.
तुझ्या पाठीच्या कण्यांतून तुझं पाठमोरं असणं मला जाणवतंय
आणि स्तब्धतेचे निर्जन प्रदेश
पसरलेले आहेत या मधल्या अवकाशांत.
नाही एकसुद्धा वाढत जाणारी वस्तू आता उरलेली;
बोटभर चिंधीसुद्धा राहिलेली नाही
हिरव्या पानाची.

आता या उजाड अंगणांत मुंग्या निघताहेत असंख्य छिद्रांतून भराभरा :
त्यांच्या तोंडांत कसले तरी पांढरे कण, बहुधा त्या मोडक्या तुकड्यांचे,
सांभाळत. मुंग्या वाढत जाताहेत. हातांवर, पायांवर, मानेवर...
निर्धास्तपणे वावरत आहेत त्या,
बागेच्या कोपऱ्यांतील दुर्लक्षित मातीच्या ढिगाप्रमाणे,
सगळ्या वर्तमानासह,
मुंग्यांनी वेढून जातो आहे हळूहळू माझा चेहरा...

## आता या रानांत

आता या रानांत पाखरांनी राहणं
शहाणपणाचं ठरणार नाही,
असं मी म्हणालों स्वतःशीच.
मला दिसला होता जाळ दूरवर
हिरव्या पानांची काळी राख करून टाकणारा,
जवळ येऊं पाहणारा.

म्हणून मी म्हणालों स्वतःशीच
आणि हाकांनी रान भरून टाकलं.
पण कुठल्याही पांखराचा पंखदेखील हलला नाही
की चोचींतलं चिवचिवणं उमटलं नाही.
पाहिलं मीं सर्वत्र :
नाहीतच. नव्हतींच का पाखरं...
शहाण्यासारखीं केव्हाच निघून गेलेलीं.
होत्या त्या माझ्या हाका,
ज्या कुणी ऐकणार नव्हतंच.

आता हा जाळ
जवळ येत चाललेला.

माझ्या हाका कोळपून गेलेल्या.
आणि मी
जाळासाठी नुसतं इंधन.

काल इथं वणवा लागला होता,
एवढीच बातमी, असली तर असेल
न फिरकणाऱ्या पाखरांसाठी.

## घर

घर असेल :
उन्हांत काळवंडलेलं. पावसांत शेवाळलेलं.
तूं आत येशील.
तुझ्यामागं दार बंद होईल, आपोआप.
तूं समोर पाहशील :
धुळीनं माखलेलं टेबल,
टेबलावरच्या थाळींत बुरशी आलेलं अन्न,
पाण्याचा अर्धा ग्लास,
उघडलेलं वृत्तपत्र,
एक नुस्ताच पेपरवेटचा डोळा.
असंबद्ध.
घर असेल
घरपण सोडून गेलेलं.
तुझी घुसमट होईल.
बाहेर जावं, म्हणून
तूं वळशील.
तूं वळशील, पण
दार उघडणंच विसरलेलं असेल.

## डोळे

डोळे दुखतात. संध्याकाळचा सावळा उजेड
डोळ्यांमध्ये उतरतो. झाडांचीं काळवंडत चाललेलीं पानं
आणि त्यांत दडलेलीं पाखरं
डोळ्यांच्या वर किलबिलत असतात. सुयांसारखीं अग्रं
असतात त्या आवाजांना. झाडांच्या पलीकडे
हमरस्त्यावर धूळ आणि धूर. खिडकींतून पाहताना
डोळे अनावर दुखतात.
तुझ्याकडे वळतात. तूं साकळत चाललेल्या अंधाराचाच
भाग झालेली.
अंधारांत डोळे अधिकच दुखतात.

## प्रदेश

। १ ।

मन त्रासलेलं. पोळलेलं कुत्रं जसं
इथं लोळतं, तिथं लोळतं,
तसा मी
तुझ्या डाव्या कुशींत येतों, उजव्या.
डोकं खुपसतों, तुझ्या छातींत, मांड्यांत.
पडून राहतों शेजारीं, उठतों, पुन्हा येतों
तुझा स्पर्श शोधत.
डोक्यांत जळत असतं
आपल्या सोबतीचं शहर,
आणि मी धावत असतों आकांतानं
पेट घेतलेल्या अस्तित्वासह
तापलेल्या रस्त्यांवरून.

। २ ।

कित्येक दिवसांत काही चांगलं घडत नाही आहे.
असं वाटतं की चांगलं घडण्याच्या सगळ्या शक्यता
वाळूंत पाणी जिरून जावं तशा मावळून गेल्या की काय,
आणि उरल्या आहेत वाईट घडण्याच्याच केवळ,
अटळ विनाशाप्रमाणं.
जिवावर टांगलेलीं असतात अशुभाचीं
न दिसणारीं निमित्तं.
आणि दिवस हातावरून काच फिरवावी तसे
चिरत जातात आयुष्य.
थांबवूं शकत नाही कांहीच आपण; नुस्ते साहतों,
आणि वाहतों आपल्याच चांगलं घडण्याच्या इच्छांचीं
सडत चाललेलीं प्रेतं.

। ३ ।

आपण एका वेगळ्याच प्रदेशांत सापडलोंय, असं वाटतं.
जिथं ओरबाडून टाकलं जातंय सगळं,
आपलीं मनं छिन्नविच्छिन्न
आणि इच्छांच्या धांदोट्या.
कसे आलों इथं, जिथलीं झाडं पिळवटलेलीं
आणि जमीन जळालेली.
नुस्ता वारा वाहतोय ओसाडीचा
भणभण करीत मस्तकांतून.
तुझंमाझं सोबत असणं बनलंय
न भरणाऱ्या घावासारखं.
कसं थांबवायचं स्वतःला उसवून जाण्यापासून
या वेडसर प्रदेशांत,
आणि निभावून न्यायचं कसं
काळजांतलं क्षीण होत चाललेलं गाणं
कर्कश आवाजांच्या या प्रदेशांत ?

। ४ ।

तसा आता कशावरच विश्वास राहिला नाही.
स्वतःवरदेखील.
म्हणजे आता जवळजवळ संपलंच;
आता वाळवी लागून हळूहळू माती व्हावी झाडाची,
तसं आयुष्य हातीं उरलंय.
हें स्वीकारायचं आणि अतिशय समजुतीनं
स्वतःच्या विनाशाकडे एक एक पाऊल टाकत
शांतपणे चालत जायचं.
मागे सुटतंय तें सुटूं द्यायचं.
कधीतरी सारंच सुटणार असतं,
पिरगळलेल्या हाताच्या पकडींतून एखादी वस्तु
सुटून जावी, तसं हेंहिं : आयुष्य.

। ५ ।

मेंदू बधिर झाला की असं होत असतं का :
आपलाच हात आपल्याला सापडत नाही,
तो आपल्या खांद्याला चिकटून असला तरी.
मला हात नव्हतेच की काय, कुणास ठाऊक.
काय होतं, काय नव्हतं,
समजेनासं झालंय.

। ६ ।

तूं ऊठ. स्वतःला सावर
आणि मला हात दे. वर उचल.
ओढ लावणारं पाणी, आयुष्य कापणारं,
मागे पडलं आहे.
डोहाच्या हिरव्या तळघरांतून
तूं ओढत आणलंस इथवर;

आता थकूं नकोस; नाहीतर,
हें काळोखाचं पाणी
दार लावून घेईल.

। ७ ।

मी पाहतों तुझा होरपळून काळा झालेला चेहरा
जगण्याच्या ज्वाळांनी;
फिरवतों माझा जन्मापासून घेऊन आलेल्या रेषांचा
तळहात, या चेहऱ्यावरून.
मी चाचपतों तुझं अस्तित्व
या असीम उजाड प्रदेशांत
वाळूच्या बोटांनी.

## मुद्रा

खाली बसलों.
आधी नुस्ता झळझळीत पितळी सिंह दिसला.
मग जमिनींतून वर आलेला देवीचा चेहरा :
डोळे गारगोटीसारखे कठोर.
ओठ मुरडलेले. कुत्सित हसणं.

म्हटलं, मला असं दोरांनी बांधून जखडून
इथं आणायचं कारण नव्हतं.
तसाहि आलोंच असतों.
उंच लाकडी कठड्यांनी घेरलेलं जनावर,
पायांत खोडा घातलेलं, तिथंच येतं परत परत.
त्याला जाणीव असते, तुझ्या दोरांचा फास
फेकला जाऊं शकतो दूरवर.

आता एकच राहिलं आहे :
माझं तोंड खाचेंत असं बसव
की, तुझ्या चेहऱ्याकडेच माझे डोळे लागलेले असतील.
तर तेंहि कर.
मग तुझी तत मुद्रा पाठीवर उमटतांना
कातडीची थरथरहि होणार नाही.
आणि मला स्वीकारतां येईल
त्यानंतर येणारं तुझ्या इच्छेचं धारदार पातं.

## अदृश्य

अदृश्य शक्तीला ऐकूं जाईल त्या घंटेच्या दोरीपर्यंतसुद्धा
आपला हात पोचत नाही,
इतके आपण ठेंगू.
नुसतंच अधांतरीं लोंबकळणाऱ्या दोरीकडे पाहायचं
आणि हताश हात
मोडल्यासारखा बाजूला ठेवायचा.
तिकडे घंटा आहे का आणि ती वाजते की नाही,
हेंसुद्धा आपल्याला ठाऊक नाही.
आणि ती वाजत असली तरी त्या शक्तीला
ती ऐकूं येते की नाही की ती अदृश्य शक्ति बहिरी आहे,
हेंहि माहीत नाही.
आपल्यासाठी तरी ती बहिरी आहे आणि मुकीहि आहे.
डोळे असतील, पण त्या डोळ्यांना दिसत असेल कांही,
शंका आहे.
मी दिसतों आहें,
माझीं हीं सतत जळत असलेलीं बुबुळं दिसताहेत,
उद्ध्वस्त शहरासारखं हें माझं मन दिसतं आहे,
की कांही दिसतच नाही ?
नुसतींच आहेत बुबुळं...

मी नुस्ता प्रश्नांनी धुमसत असतों
आणि कोणत्याही दिशेकडून येत नाही
उत्तराचा शब्द.

## ईश्वराचा क्रूर चेहरा

ईश्वराचा क्रूर चेहरा घामानं निथळत असतो;
आता कोणता नवा व्यूह रचावा,
त्याला सुचत नसतं;
रागानं तो हात आपटतो पुढ्यांतल्या टेबलावर.
हा क्षुद्र कीटक अजून कोसळत कसा नाही,
कसा हा पुन्हा पुन्हा
या काचपात्राच्या भिंतीवर
त्वेषानं नांगी आपटत राहतो.
ईश्वराच्या डोळ्यांत त्या क्षुद्र कीटकाविषयी
आत्यंतिक तुच्छता
आणि त्याच्या न कोसळण्याच्या स्थितीनं
उद्वेग.
ईश्वर हताश आहे.
पुन्हा एकदा कडाडून नांगी आपटतो
तो क्षुद्र कीटक
त्या काचपात्रावर,
तेव्हा ईश्वर कुत्सित हसतो;
मतिमंदासारखा स्वतःशीच टाळ्या वाजवतो.
ईश्वराला नाकारायचा आहे
स्वतःचा पराभव.
त्याला कळलं आहे :
क्षुद्र असलाच तर तो स्वतः; कीटक नव्हे.
आणि पुन्हा तो आत्यंतिक क्रौर्याच्या
नव्या योजना आखूं लागतो...

## देवाचं प्रेत

"आता हें प्रेत तुला
तुझ्या खांद्यांवरून वाहून न्यायचं आहे."
खरबरीत आणि घोगऱ्या आवाजांत
कोण म्हणालं हें
म्हणून मीं सर्वत्र पाहिलं,
तर एका कोपऱ्यांत खुज्या दैवासारखं
चेहऱ्यावर वाकुल्या घेऊन
कोणीतरी बसलेलं.
मी जवळ जाऊन पाहिलं,
तेव्हा त्यानं जांभईसाठी जबडा उघडला,
तर नव्हतीच आत जीभ.
परत जबडा मिटून
तें बसलेलं स्वतःत बुडून.
मागे वळून परत आलों प्रेताकडे :
तें आता वाढून झालेलं अजस्र.
अवाढव्य शिल्पासमोर
किरट्या कीटकासारखं माझं अस्तित्व.
मी चार पायांवर चालत,
इकडून तिकडून वाट शोधत,
हिंडत राहिलों.
पण कसं पकडावं आपल्या हातांत,
कळलं नाही,
हें शतक, या शतकांतलं देवाचं प्रेत.
माझं दुखरं अस्तित्व
भ्रमत राहिलं दिशाहीन...

## भट्टी

तूं ईश्वराचं तोंडीलावणं आहेस,
त्याचं कालवण आहेस,
मसाला घातलेलं मांस आहेस.
तुझ्या खारवलेल्या बरगड्यांत
त्याचे करवतीसारखे दात
चिडखोरपणे रुततात.
तो चव घेतो
आणि डोळे वटारून पाहतो
आणि फेकतो भट्टीत
चर्र भाजण्यासाठी पुन्हा.
तो डोळे मिटून खमंगपणा अनुभवतो,
काढतो घाईनं दचकून
तेव्हा तुझा कोळसा झालेला असतो.

## तपासनीस

अधू डोळ्याची काळी मोटरसायकल
चाचपडत जात असते भौतिक खाचखळग्यांतून
या मर्त्य शहराच्या.

अचानक रोखली जाते एका वळणाशी
तपासनिसाकडून.
सगळीं कागदपत्रें सादर करावीं
आणि वर पाहावं
तर तपासनिसाला चेहराच नसतो :
नुसताच अंधार सारवलेला अगम्य आकार...

## मंदिराच्या बाहेर

मंदिराच्या बाहेर
पायऱ्यांवर मी बसलोंय या सकाळीं
आतला घंटानाद ऐकत.
मी विचार करतोंय की हें सगळं
कां होतंय ?
मला उमगत नाही पृथ्वीचं तर्कशास्त्र
आणि ही दैवी संरचना.
कां मी असा बाहेर पायऱ्यांवर बसलोंय
आणि कां आत मागणारे
आणि तथाकथित देणारे ?
देणारे काय देतात,
मागणारे काय मागतात—
माझा कशाशीहि कांही संबंध नाही.
मला काय मागायचं आहे,
मला कोणी काय द्यायचं आहे...
माझे तळहात अस्वस्थ फडफडताहेत
दगडी पायऱ्यांवर.
मी देण्याघेण्याच्या पलीकडचा आहें.
जें आहे तें आहे,
आहे तें नाहीसें होत नाही,
नाही तें आहेसें होत नाही,
जें नाही तें नाही.
माझ्या वाट्याचं तें सगळं माझंच,
जें जें असेल तें तें.
माझ्या वाटेचं तें सगळं माझंच :
या पायऱ्या, हें सकाळचं ऊन,
हा मी, माझ्या हातांतलं हें कमळ देठ मोडलेलं,

हा कानांवर येणारा घंटानाद,
हे थकलेले पाय,
झिजलेल्या वहाणा,
थंड दगडी फरशी...

## बुजगावणं

जें जिवापाड जपावं
आणि हरवलं तर कायमचं हरवलं असं वाटावं
तें हरवत असतांना पाहावं लागावं,
आपल्या हातांच्या आवाक्यांत नसावं...

मग हातांमधली शक्ति जाते;
क्रमशः सारं शरीरच निरर्थक बनतं;
तेव्हा शब्द साधूं शकत नाहीत
कसलाच संवाद.

ओठ नुस्ते हलत असतात
निरर्थकपणे :
बुजगावण्याची बाही हलावी वाऱ्यानं.
हळूहळू आपल्याला कळत जातं
की आपण आहोंत
एक बुजगावणं
भीतीचंहि कर्तव्य बजावत नसलेलं.

आता गमावण्यासारखं
उरलेलंच नसतं
कांहीहि.

## शोध

हल्ली वसंत इथं नसतो काय,
मी त्यांना विचारलं.
असतो तर काय, एक जण म्हणाला.
कुणास ठाऊक, दुसरा.
अलीकडेच पाहिल्यासारखं वाटतं, कुठं बरं, तिसरा.
कोण वसंत, काम काय आहे तुमचं, चला निघा, चवथा.
फालतू चौकशा, पाचवा.
सहावा, सातवा, अकरावा, शंभरावा.
शेवटीं कुणीतरी वैतागून म्हणालं,
परवाचा तो भयानक अपघात—त्यांत तो दगावला.
शेवटी, सगळीं इतर माणसं संपलीं, तेव्हा मी उरलों.
तेव्हा मी स्वतःलाच विचारलं,
हल्ली वसंत इथं नसतो काय...

पानं गळालेल्या रुख्यासुक्या झाडांमधून
जखमी घोड्यासारखा हिंडत असतों मी
स्वतःलाच हाका मारीत, वसंत वसंत...
साऱ्या रानभर होऊन तेच शब्द परत फिरतात
आणि आदळतात वाऱ्यासारखे माझ्या कानांवर.
मला दुसरा शब्द सुचत नाही;
दुसरी हाकच माझ्या गळ्यांत येत नाही.
मी विव्हल होऊन सर्वत्र शोधतों
आणि आकाशाकडे तोंड करून ओरडतों, वसंत वसंत...

माझ्या हाकेला उत्तर येत नाही.
शरीराच्या अरण्यांत, मनाच्या काळोख्या गुहांमध्ये,
मेंदूच्या विराट पोकळींत मी हाक देतों.
अविचल दगडी शांतता. त्यावर फुटणारे हाकांचे तुकडे.

## ओसाड गावाच्या शिवेवर

ओसाड गावाच्या शिवेवर असलेल्या लाकडी दैवतासारखा,
पाऊस घेत, उन्हानं काळवंडत
मी उभा आहें वर्तमानाच्या सीमेवर तडा गेलेला चेहरा घेऊन.
मी शुभ नाहीं, अशुभ नाहीं; मी कांहीहि नाहीं;
मी कर्ता नाहीं आणि अकर्ताहि नाहीं;
माझे हात तर लाकडीच आहेत : ते उचलले जात नाहीत आशीर्वादासाठी
अथवा विनाश रोखण्यासाठी;
मी नुस्ताच आहें आणि माझं असणं मला टाळता येत नाही;
झिजून नष्ट होईपर्यंत मी असेन.
माझ्या पायांकडे पाहा, वाळवीला सुरुवात झाली आहे...

## गिधाड

हें कोवळं ऊन आईच्या बोटांसारखं
माझं अस्वस्थ मस्तक कुरवाळतं.
पलीकडच्या झाडांचा हिरवागर्दपणा
माझ्या जळत्या डोळ्यांमध्ये थंड काजळ होऊन जातो.
नदीच्या पाण्याचा अंगाईसारखा स्वर
माझ्या मनांत पाझरत चाललाय.
आता मी स्वस्थ पडून राहीन या दैवी गुंगींत...
म्हणतां म्हणतां, दंश होतो कपाळांत
आणि यातनांचा डोंब उसळतो.
नदी, झाडं, ऊन : कांहीहि नसतं.
असतं एक विशाल राखाडी पंखांचं गिधाड
मान उंच करून तीक्ष्ण नजरेनं माझ्याकडे बघत
हळूहळू समोर सरकत असलेलं.

## जागा

या भोवतीच्या दुसऱ्या वास्तवांत
एखाद्या जखमी जनावरासारखं हिंडत असतांना
अशी कल्पनाहि करवत नाही; पण
कदाचित् एक दुसरं वास्तव असेल, अवकाशांत,
आपल्या कल्पनेच्या टप्प्यापलीकडे,
याहून निराळं;
जेथे असूं आपण सुखी
आणि मनावर ओझीं नसलेले;
जेथले दिवस कोवळे
आणि रात्री अलवार असतील.

कविता, पुस्तकं, अंमल, ईश्वर :
कोणतंही तथाकथित दार दुसऱ्या वास्तवाचं
उघडं नसतं,
आणि मी माघारी येतों,
जिथं मी होतों, तिथंच,
जनावरानं गोठ्यांत परतावं, त्याप्रमाणे.

## चेहरा

अलीकडे आपला चेहरा बदलत चाललाय का
म्हणून तो पाहतो आरशांत
तर दिसत नाही आरशांत त्याचा चेहरा;
दिसते वाकलेली मान;
झुकलेली पाठ.

तो पाहातोय आरशांत स्वतःला पाठमोरा

आणि उमजतो :
झालोंय आपण पाठमोरे स्वतःचे स्वतःलाच
आणि आता वाचवूं शकत नाही चेहऱ्याला
होत चाललेल्या बदलांतून.

## निर्णय

आता हें बुडत चाललेलं जहाज आहे.
कुठल्या वस्तू वाचवाव्या,
काय सांभाळावं, कशाची खबरदारी घ्यावी...

सगळ्या साठवलेल्या वस्तूंच्या भारानं
तें रुतत चाललं आहे पाण्यांत हळूहळू...

आता हातांच्या तळव्यांत
तोंड लपवून बसायचं,
की डेकवर शांतपणे उभं राहायचं,
एवढाच निर्णय घ्यायचं
शिल्लक उरलंय.

## संध्याकाळ आहे

संध्याकाळ आहे. दिवसभर कावकाव करीत हिंडणाऱ्यांपैकी
एक कावळा थोडा वेळ खिडकीवर बसून निघून गेलाय.
आता सारे कावळे स्तब्ध होऊन जातील
अंधार साकळत असलेल्या त्या समोरच्या झाडाच्या पानांमध्ये.

घरांच्या खिडक्यांचे चौकोन उजळत आहेत
अंधाराला फुटलेल्या डोळ्यांप्रमाणे, ज्यांत बुबुळं नाहीत
तर नुसत्याच खाचा आहेत.
रस्त्यावरच्या वाहनांचे आवाज, रेडिओ-टीव्हीच्या गाण्यांचे
आवाज, संध्याकाळचे आवाज.
खिडकीबाहेर संध्याकाळ आहे.
सबंध दिवस. नंतर येत असलेली संध्याकाळ. होणारी रात्र.
संध्याकाळ म्हणजे करवत आहे
सबंध दिवसाच्या शरीरांतून मंद गतीनं फिरत असलेली.

## खिडकी

तो पाहतोय :
खिडकींतून बाहेरच्या उन्हांतलं झाड
झळांसारखं,
पानं नसलेलं, ज्वाळांसारखं जमिनींतून
वर आलेलं.
त्याच्या वर उंचावलेल्या फांद्या
आभाळांत घुसलेल्या.
निळ्या अवकाशांत
झाडाच्या निष्पर्ण फांद्यांवर
एक पांढरा ढग रुईसारखा.
फांद्यांवर ढगांचीं
रुईसारखीं पांढरीं फुलं.

झाड पाहतंय :
खिडकींत एक चेहरा
धूसर,
निष्पर्ण फांद्यांवरील शुभ्र
ढगासारखा.

खिडकी,
दोन्ही दिशांना
उघडीच आहे.

## दार

शेवटीं तूं येतोस त्या शेवटच्या दाराकडे
आणि म्हणतोस की आता हें दार उघडलं की
बाहेर जाईन, सूर्यप्रकाशांत राहीन...
तुला माहीत असतं की खरं तर तें दार
कुठंच उघडत नाही.
काळोखांत उघडणाऱ्या दारांना भिऊन
तू हें दार रचलेलं आहेस :
हेंही दार उघडूं शकलास तर
पलीकडे काळोखच असेल...
तूं थांबतोस, दार उघडायला
हात पुढं करीत नाहीस :
तू नुस्ता स्तब्ध उभा असतोस...

## हिरव्या टेकडीवरून

हिरव्या टेकडीवरून उतरत आहेत घोडे
आयाळ उडवीत, वाऱ्याच्या मस्तींत;
हिरव्या टेकडीवरून हिरव्या विस्तीर्ण कुरणांत
धावत जाताहेत, पावसाळ्यांतील दुपारीं,
वाऱ्यासारखे घोडे.

ढग पळताहेत टेकडीच्या मागच्या अंगाला;
तिथून ते दरींत उतरतील
घोड्यांच्या मस्तीने आणि परत वर
चढाई करतील.

दूर गावालगतच्या देवळाजवळ चरतां चरतां मध्येच
थबकून पाहत राहतो शुभ्र घोडा
दूरच्या टेकडीकडे, कुणाकडे,
टेकडीवरून उतरणाऱ्या ढगांसारख्या घोड्यांकडे.
त्याच्या डोळ्यांतल्या कुणांवर ओथंबलेले
काळे ढग.

## चांदण्यांत शुभ्र घोडा

पडक्या धर्मशाळेजवळ खडकासारखा शुभ्र घोडा;
फिकट पिवळ्या मळक्या सुती कापडासारखें चांदणें;
झाडांतून सळसळ पानांची.

तो अनुभवतोय स्वतःची नासाडी,
जन्मापासूनचा विध्वंस, या पृथ्वीवरील.
त्याचें पाणी तुटलेंय आणि जमीनहि दूर जाते आहे
त्याच्या नाल मारलेल्या खुरांपासून.

भणभण ओसाडपणांत
शुभ्र घोडा.

शोकवस्त्रांप्रमाणे काळोख पांघरलेला एक मोटा जमाव
हळूहळू वाट चालत येतो आहे त्याच्या दिशेने.
मेणबत्त्यांच्या उजेडांत पिवळट चेहरे,

हातांतलें जाड दोरखंडाचें वेटोळें
आणि अणकुचीदार शेंब्या असलेल्या कानापर्यंतच्या काठ्या.

चांदण्यांत शुभ्र घोडा
खडकासारखा.

## वादळी घोडा

चांदीसारखा खणखणीत वादळी घोडा
खिन्न उदास रस्त्यावरून चालतोय;
त्याच्या टापांचा दहशतवादी आवाज
झणझणतोय फरसबंदीवर.
बंद होतात फाडकन्
करकर वाजणारीं चुगलखोर खिडक्यादारें;
कातडीच्या रोगाचे जंतु पसरूं नयेत म्हणून
झाकून घेतले जातात सारे अवयव
जाड पांघरुणाखाली.

तो थांबतो,
मान उचलून वर पाहतो कांही क्षण
निश्चल दृष्टीने;
त्याची शुभ्र आयाळ सळसळते करारी.
एक जोमदार खिंकाळी दाटून येते छातींत.

तो फक्त मान खाली घेतो,
उंच सुरांतून एकदम खालच्या सुरांत यावें.
तसा.

## नदीच्या काठानं शुभ्र घोडा

नदीचं पाणी
झळझळ करतंय उन्हांत;
काठाकाठानं हिंडतोय शुभ्र घोडा.
त्याला वाटलं; पाणी प्यावं,
गवतानं तोंड कडू झालेलं;
बरं वाटेल.

शुभ्र घोडा पाण्याजवळ तोंड नेतो;
त्याला दिसतो दुसरा पांढरा घोडा पाण्यांत;
त्याचा वेदनेनं पिळवटलेला चेहरा.
शुभ्र घोडा तोंड लावत नाही पाण्याला;
वळतो.

नदीच्या काठानं हिंडत राहतो
पांढरा घोडा, विमनस्क.

## पूर्वज

माझ्या आजोबांच्या पणज्यानं
घागरभर पाणी आणून दिलं दूरच्या नदीवरून
जमीन तपासणाऱ्या साहेबाला;
हें इनाम नावाचं शेत त्याचं बक्षीस.

मग याच गावांतल्या एका तुकड्यावर
एक घर रुजलं.
पणज्याच्या मुलानं, त्याच्या मुलानं,
काय काय केलं हें कुठंच लिहिलेलं नाही.

फक्त हस्तलिखित पोथ्या सापडल्या : अक्षर सुंदर
आणि जन्मसातत्य ठेवलं
हेंहि कांही कमी नाही.

आजोबा कर्तबगारच निघाले :
घरं बांधलीं, शेतं घेतलीं,
बायकोआणि सुनांकडून कष्ट करवून घेतले.

आमच्या घराण्यांतल्या बायकांनी
तसं विशेष कांही केलं नाही.
हेंच मैल मैल चालत जाऊन नदीवर धुणीं धुणं,
पहाटे उठून जात्यावर खंडीभर डाळ भरडत बसणं.

माझा मोठा चुलता अकालींच वारला.
घराचं सगळं ओझं वडलांच्या डोक्यावर.
ते बहुधा वर्तमानपत्र वाचत राहायचे.
पोथ्यापारायणं, जुनीं घरं पाडून नवीं बांधणं,
वणावणा आयुष्य झिजवत राहणं.
असं सगळं.

माझं ठीक चाललेलं आहे,
वणवणीसहित.

## घर सोडून

घर सोडून मी निघालों तेव्हा
माझ्यासोबत कोण होतं ?
घर सोडून मी निघालों तेव्हा
तुमच्यासोबत कोण होतं ?

घर सोडून मी निघालों तेव्हा
घरासोबत कोण होतं?
तुम्ही घराच्या दारांत होतां
तेव्हा रस्त्यावर कोण होतं?

रस्त्यावर मी होतों
आणि घराकडे पाहत होतों;
ज्या रस्त्यावर मी होतों
तो घराकडे वळणारा नव्हता.

मी रस्ताच होतों
घरांतून बाहेर निघालेला
आणि हें माहीत नव्हतं आतापर्यंत
मला, तुम्हांलाहि.

## निघणं

घर सोडून जातांना
शेवटी पुन्हा एकदा सगळं पाहून घेतलं :
सगळीं दारं नीट बंद आहेत की नाहीत, त्यांच्या कड्या,
खिडक्या, चुकून एखादी चिमणी आत तर राहिली नाही,
नळ, मेनस्विच, कपाटं झाकलेलीं, पुस्तकं लावलेलीं,
भांडीं आणि अंथरुणं गोळा केलेलीं.
सगळं ठीक आहे; कांहीच राहिलेलं नाही.
तर निघावं, निघावंच आता,
म्हणत बसलों फरशीवर भिंतीला पाठ टेकून;
उठलों : देवापुढं दिवा लावून ठेवावा;
आता संध्याकाळ होतेच आहे...
आता मात्र झालं सगळं.

कांही विसरलों तर नाही,
बरोबर घेतलं सगळं,
म्हणत सामानाकडे नजर टाकली;
मनांत आठवून पाहिलं
की काय काय कशांत घेतलं.
आता निघायलाच पाहिजे
म्हणत बाहेरचं दार बंद केलं.
थांबलों. आता नाही राहिलेलं कांहीच.
निघालों. तरी वाटत राहिलं
की कांहीतरी राहिलंच...

## शिलालेखावरील अक्षर

शिलालेखावरील अक्षर लावावें तसें
मी आईकडे पाहतों.
तिच्या डोळ्यांत गुरें परतण्याची संध्याकाळ.
कातडें झिजून हाडें ठळक व्हावीं तसे तिचे दिवस.

माझ्या पोटांत वळवळतात जाड दोरखंडें.
मी माझ्याभोवतीचा कठडा घट्ट पकडतों हातांनी.
माझ्या आणि तिच्यामध्ये गोठलेलें पाणी.
अनंत कठडे उजळतात आणि वितळतात.
वर्तुळगतीने फिरणाऱ्या, खोल खाली कोसळणाऱ्या पायऱ्या.
पायऱ्या.
प्रत्येक पायरीला जडवलेले
गायीचे डोळे. सताड उघडे.

## पडझड

इथं आता बरीच पडझड झाली आहे.
या ठिकाणीं झोपाळा असायचा,
सारखा झुलत असणारा,
आणि लिलीचीं फुलं, झोपाळ्याचं गाणं ऐकून निजलेलीं;
झोपाळा थांबला की हळूच एक डोळा उघडून पाहणारं कृष्णकमळ
हें इकडे होतं.
आता त्रस्त मनासारखं हें मोकळं अंगण
आणि त्यांत काळसर जखमांसारखं उगवलेलं हें गवत.
आता कुठलाही पक्षी दाणे टिपायला येत नसावा
ओसाड, टाकून दिलेल्या घराच्या अंगणांत.
एरवी इकडे वसतीलाच असायचे चारदोन भारद्वाज,
पाचसहा साळुंक्या, आणि असंख्य चिवचिवणाऱ्या चिमण्या.
घरानं आपलीं दारं आता बंद करून घेतलीं आहेत,
पण इथं बाहेरहि ऐकूं येतो आहे त्याच्या आत घुमणारा
ओसाडीचा वारा.
आता या पावसाळ्यांत कशाबशा तग धरून असलेल्या या भिंती
अधिकच वाकतील आणि आवाज न करतां स्वतःला
जमिनीवर अंथरतील.

## सरतेशेवटी

सरतेशेवटी काय, तर तुम्हांला जुळवून घ्यावंच लागतं
भोवतालच्या काळाशी. म्हणून मग सरतेशेवटी
मी उतरून ठेवला वेष योद्ध्याचा, उचकटली मिशी, पुसला रंग,
उंच आवाजांत ओरडून दुखत असलेला जबडा,
मिटून ठेवला सरतेशेवटी. आणि पाहत राहिलों फळ्या काढणं,
दोऱ्या सोडणं, पडदे गुंडाळणं; सरतेशेवटी समोरचं उठून गेलेलं जग;

दारांचं आपटून बंद होणं, कड्याकोयंड्यांचं लोखंडी वाजणं.
सरतेशेवटी सरतं सगळं आणि उरतो शेवट, उरतो थकवा,
सरतेशेवटी...

## बाहुलं

हें आम्ही खास बनवून घेतलं आहे चिंध्यांचं, वाळूचं, जुन्या
गाद्यांमधल्या कापसाचं, रद्दीचं
झक्कासपैकी बाहुलं.
आम्हांला कशाचाहि राग आला की,
तो काढायचा कुणावर हा प्रश्न आता राहिला नाही.
यायचं आणि ठोसे मारायचे याला, आपल्या रागाचा
सारा निचरा होऊन जाईपर्यंत.
आजकाल काय झालंय की दर क्षणीं आपल्याला
कशाचा ना कशाचा राग येतोच येतो,
मग तो आपल्या मस्तकांत वळसे घेत राहतो
आणि आपण कांहीच करूं शकत नाही या जाणिवेनं
आतल्या आत फूत्कारत राहतो.
हें ठीक नसतं प्रकृतीच्या दृष्टीनं.
शिवाय या बाहुल्याचं वैशिष्ट्य हें आहे की,
तें कण्हतं, यातनांनी पिळवटतं, रक्ताळतं;
आणि आपल्याला बरं वाटतं की अगदीच निर्जीव वस्तूवर
आपण राग काढत नाही,
कारण की सजीव वस्तूच हवी असते राग काढून
शांत व्हायला.
तर हें आहे बाहुलं रागानं मारलेले ठोसे स्वीकारणारं,
मनसोक्त बुकलूं देणारं, कण्हणारं, पिळवटणारं,
चिंध्या लोंबल्या तरी
नवे तडाखे स्वीकारण्यासाठी तयार असलेलं.
तें असतं खुर्चीवर, खाटेवर, खिडकीशीं, खाली जमिनीवर

आपल्या जन्माचा हेतू सार्थ करण्यासाठी तत्पर.
तें आता दिसायला लागलंय आमच्यासारखंच,
आमच्यांतलंच.

## बैलाचा मृत्यु

एखाद्या बैलाच्या नशिबांत
चिखलांत रुतून राहणं येतं,
एखादा शेतांतून येतां येतां
मध्येच रस्त्यांत बसून राहतो :
बैल थकला की असं होतं.

मग घरांतलं सर्वांत धाकटं पोर,
पाण्यानं भरलेली बादली
आणि हिरव्या चाऱ्याची एक पेंडी
—ज्यासाठी आयुष्यावर सबंध
जूं ओढवून घेतलं होतं—
त्याच्या सोबतीला दिवसभर.

हें बैलाला जगवणं नसतं;
तें आपल्याच शेवटच्या दिवसाची
तयारी करणं.

संध्याकाळीं बैल एकाकी असतो.
पिकांवर उतरणाऱ्या त्या उदास उजेडांत
त्याच्या डोळ्यांतलं पाणी चमकतं.
अंधाराच्या विरल पडद्याआड
एखादं घुबड ओरडतं.
तो आवाज हाच आता शेवटचा सोबती.
गाव पुढे आहे...त्याचं कांही नाहीं,
शेत मागेच राहून गेलंय...

## झाड

लाकडी शेल्फमधलं पुस्तक काढतांना आढळला
एक चिमणा मरून पडलेला.
कधी त्याचं पुस्तक मिटलं, कांही कळलं नाही.
दोन्ही पाय वर करून पडलेला, उघड्या पुस्तकासारखा,
भिंत आणि पुस्तकांची रांग यांच्या मधल्या गल्लींत.
पुस्तकांनी भरलेलं, अनेक खणांचं हें शेल्फ कदाचित्
त्याच्यासाठी झाडच : पुस्तकांचीं पानं फुटलेलं
निर्जीव लाकडी झाड.
उचलला तेव्हा तो अतिशय हलका वाटला आणि
वाळून लाकूड झालेला.
जीवनरसानं ओथंबलेल्या हिरव्या झाडावर वावरणाऱ्या
या पाखराला मरण आलं झाडाच्या कापलेल्या फळ्यांपासून
बनलेल्या शेल्फमध्ये. निर्जीव लाकूड
आणि त्याचं आता लाकडासारखं कलेवर.
झाडांत संपलं
जें झाडांत जन्मलं होतं...

## मेंदू म्हणजे एक थकून गेलेला बैल

मेंदू म्हणजे एक थकून गेलेला बैल आहे.
त्याच्या मानेवरचं जूं जड झालं की
तो रस्त्यांत कोसळून पडेल
सगळ्या गाड्यासह.

मला भय वाटतं ते एवढंच.
स्वतःचं नव्हे, स्वतःसाठीहि नव्हे.

त्या गाड्यांत तुम्ही आहांत,
बिनधास्त झोपलेले.
तुमचा तुमच्या बैलावर विश्वास आहे :
तो घराकडेच नेईल, भरकटणार नाही,
तुमच्या झोपेंत तुम्ही दचकून जागं व्हावं
असं कांही घडणार नाही.

बैलाला काळजी आहे ती याचीच
आणि तुम्ही स्वस्थ झोपत नाही की काय,
या शंकेनं तो व्याकूळहि.
बैलाचा स्वतःवरचा विश्वास उडाला
तरी तो जूं फेकून देत नाही,
हें मी पाहिलंय.
फक्त तो कोसळतो
अत्यंत सावकाश, गाड्याला धक्का न लावतां.

## निद्राहीन

बहुधा,
पहाट झाली असं समजून
डोक्यांतले कावळे जागे झाले
आणि कावकाव करूं लागले.
पहाट नव्हतीच.
तो होता डोक्यांत पडलेला चंद्राचा उजेड,
बहुधा स्वप्नांत.
मग कावळ्यांना कळलं
अन् ते परत झोपी गेले
डोक्यांतल्या झाडावर.

पण मग झोप गेली ती गेलीच.
कावळ्यांचीहि गेली असेल,
त्यांच्या डोक्यांतल्या झाडावरच्या
अचानक जाग्या झालेल्या कावळ्यांमुळे.

डोकं निव्वळ जड झालेलं
हजार कावळे अंगावर असलेल्या
झाडासारखं.
खिडकीबाहेर
चंद्राचा निर्दय उजेड.

## शून्य स्टेशन

खडक वाटलेला अचल महाकाय कासव हलावा
तशी गाडी हलते आणि अचानक तिला शेकडों हात फुटतात,
ज्यांच्यांत साठवलेला असतो पीळ
प्लॅटफॉर्मवर हलणाऱ्या हातांना स्पर्श करण्याचा.

मी हळूहळू सोडवला माझा हात
आणि असहाय उभा राहिलों तिला गाडीच्या स्वाधीन करून,
तेव्हा माझाहि हात हलत होता
देहापासून कापून फेकलेल्या तडफडत्या डोक्यासारखा.

नंतर प्लॅटफॉर्म होता असंबद्ध वाक्यासारखा उच्चारत
जाणाऱ्या अथवा येणाऱ्या गाड्यांसंबंधी
आणि माझ्या संदर्भांत तर बाहेरचं शहरहि होतं पूर्ण उदासीन.
वाटा होत्या पण त्या परतीच्या नव्हत्या...

## विहीर

त्या विहिरींत तो बादली सोडतो. खूप खोल असावी ती विहीर.
दोर सरसर करीत सरत राहिला पुष्कळ वेळ हातांतून.
वर ओढूं लागतो. कष्टानं. बरीच जड लागतेय, बाहूंमध्ये ताण जाणवतो.
बादली वर येते. तर त्या बादलींत पाणी नाही.
वाळू आहे. वाळू. पांढरी.
पुन्हा तो बादली सोडतो. पुन्हा वाळूच. तीच. तशीच.
वाळूनं काठोकाठ भरलेली बादली. असं कितीतरी वेळा.
पाणी नसावंच. वाळूच.
मग तो वळून जवळ उभ्या असलेल्यांना म्हणतो :
अहो, या विहिरींत पाणी नाहीच. वाळू आहे. नुस्ती वाळू.
लोक हसतात गालांत.
सगळी वाळू उपसून काढूं. त्याखाली पाणी असेलच.
बादलीबादलीनं खूप वाळू तो फेकतो बाहेर.
तरी वाळू संपतच नाही. विहिरीच्या आसपास वाळू.
उभे असलेले लोक बहुधा वाळूखाली.
बादली ओढतां ओढतां तो हातांतला दोर सुटून
कोसळतो वाळूच्या ढिगावर.
त्याच्या तोंडांत वाळू. डोळ्यांत वाळू.
वाळूच्या पांघरुणाखालून वाळू झटकीत
बाहेर येतात लोक. हसतात. त्यांच्या हसण्यांतून
ओघळत जाते वाळू.

## सांभाळ

एक जखमी जनावर छातीशीं धरून
मी हिंडत असतों बसमधून.
एक हात असा गुंतलेला;

दुसऱ्या हातानं मी सांभाळतों स्वतःला
कसंतरी, सांभाळायचं असतं म्हणून.

कुणालाहि आश्चर्य किंवा कुतूहल नाही वाटत
की मी माझ्या छातीशी धरून
काय आणि कुठं घेऊन चाललों आहें.

मी उतरतों बसमधून आणि चालूं लागतों रस्त्यावरून.
सहज म्हणून वर पाहतों
तर समोरचीं माणसं येत आहेत
छातीशीं जखमी जनावरं धरून.
आता मी सांभाळायचं स्वतःला
तर, कसं...

## पावसाच्या झाडाखाली

पावसाच्या झाडाखाली कवि उभा असतो.
तो ऐकतो पावसाच्या पानांचं हिंस्र सळसळणं.
पाऊस पडत असतो कवीच्या उजाड माथ्यावर,
निर्मनुष्य डोळ्यांवर,
उघड्या पसरलेल्या तळहातांवर.
पाऊस रक्तासारखा लाल आणि काळवंडत जाणारा
अविरत कोसळत असतो कवीच्या आयुष्यावर, कवितांवर
आणि तो स्वीकारत असतो पावसाचा मारा
पाठीवर, छातीवर, माथ्यावर.
तो कोसळतो, उठतो, कोसळतो,
रुजून राहातो वठलेल्या खोडासारखा उद्ध्वस्त भूमींत
आतल्या त्वचेच्याहि आत एक नाजूक कोंभ घेऊन.

## राख

कोरडा काळ खुळखुळतो भाषाशैलीला अनुसरून
कवीच्या आवळलेल्या कंठांत.
आता यानंतर उजाडतो आहे तो, कवि म्हणतो स्वतःशी,
भंगार, जुन्या गंजलेल्या लोखंडासारखा काळ
आणि पोकळ हास्य करणाऱ्या भविष्यकालीन कवस्या
उगवत जातील वर्तमानाच्या उजाड जमिनींत.

एक अस्वस्थ योद्धा मोडकळीस आला आहे.
लढाईच्या पवित्र्यांत उभं राहून राहून
त्याच्या मानेवर गंज चढलाय.
तो घासून टाकण्याइतपतही लढाऊपण उरलेलं नाही
बिजागरं सैल झालेल्या बोटांत.
अवघडलेल्या स्थितींतून जेव्हा तो बाहेर येतो,
सगळे सांधे करकरतात आणि निखळून पडतात
स्वप्नांचे नट, बोल्ट, स्क्रू...

कवि वाकतो खाली वास्तवावर आणि उचलूं लागतो
तीं निरुपयोगी साधनं देह जोडणारीं,
तेव्हा उघडली जाते त्याच्या मस्तकाची झडप
आणि सांडते खाली त्याच्या आकांक्षांची राख...

## स्थान

कवीचं आजच्या समाजव्यवस्थेंत काय स्थान आहे ?
किंवा मनुष्याचं आजच्या जगांत काय स्थान आहे ?
कवि स्वतःच्या मनांतच प्रश्न विचारतो
सकाळीं सकाळीं हातांत वृत्तपत्र असतांना.
रात्रीं मरून सकाळीं जिवंत झालेले, तोंडास काळं फासून
उजेडांत आलेले मथळे. घसा सुजलेला शब्दच्छल.
अधिक ओझं लादून वरून उडून जाणारा मजकूर.
हिंस्र पक्ष्यासारखा कागदांचा फडफडाट.
कवि खिडकीपलीकडच्या रस्त्यावर नजर टाकतो
आणि वृत्तपत्राकडे पाहतो. कवीला हसू येतं.
सगळीकडे तेंच आहे. डोळ्यांत काय, हातांत काय.
तो चष्मा काढतो आणि समकालीन बेपर्वाईच्या
या मख्ख मुद्रांकडे हताशपणे पाहत राहतो.
मग वृत्तपत्राचा चेंडू करून तो खिडकींतून रस्त्यावर फेकतो.
आंत अस्वस्थ वाटतं म्हणून कवि दार उघडून
रस्त्यावर येतो आणि खिडकीकडे पाहतो.
खिडकीपलीकडे आता कुणीहि नाही.
मग कुणीतरी, कवीला कळत नाही, त्याला खिडकीतून आत फेकतं.
कवि कोपऱ्यांत पडतो गोळा होऊन. पाठोपाठ
त्याच्या मस्तकावर आदळतो वृत्तपत्राचा चेंडू.
खिडकी धाडकन् बंद होते, दारहि, बाहेरून.
त्या वेळीं बाहेर रस्त्यावर हजारों पायांखाली येत असतो
कवीच्या खिशांतून पडलेला कवितेचा कागद.

## पाठीशीं स्मशान घेऊन

या भिंतीला पाठ टेकून मी बसलों आहें.
मागे स्मशान आणि समोर समुद्र.
ही एक उतरती दुपार आहे आणि सूर्य
एखाद्या अधू पायाच्या घोड्यासारखा
हळूहळू चालतो आहे.
स्वतःच्या मरणाकडे थकलेल्या श्वापदाने जावें तसें
ऊन कलतें आहे.
असा समुद्राकडे पाहत मी बसलों आहें.

माझें चित्त शांत आहे.
चित्त शांत असणें ही फार मोठी मिळकत असते.
त्यासाठी अर्थातच किंमतहि
पुष्कळच मोजावी लागते.
या जगांत कांहीहि विनामूल्य मिळत नाही.
अर्थात् असें मिळविल्याने काय मिळतें कुणास ठाऊक.
शक्य आहे की कांही मिळत असेल.
कुणी काय मिळवावें हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे.
मला कांही मिळवणें महत्त्वाचें वाटत नाही.
मिळवणें म्हटलें की गमावणें येतेंच.
मिळवण्याचा आनंद असेल तर गमावण्याचें दुःखहि.
मला कांही गमावणें महत्त्वाचें वाटतें.
मिळवणें आपल्या हातांत असतें,
पण गमावणें तसें नसतें.
कुठला तरी अज्ञात हात आपण मिळवलेलें काढून घेतो.
त्या हाताचा स्पर्श मला महत्त्वाचा वाटतो.
त्याला आपण बोलावल्याने तो येत नाही,
की आपण त्याची वाट पाहूं शकत नाही.
आपल्या अगदी नकळत तो हात येतो,
आंधळ्याच्या वाटींतले पैसे
हलक्या हाताने उचलावे तसें.

भान यावें तेव्हा तो हात नाही, त्याचा मागमूस नाही,
शिल्लक राहतें तें हेंच की आपल्याजवळ जें होतें
तें आता नाही आहे, असें वाटणें.

मग आपण हातपाय झाडतों, आरडाओरड करतों
किंवा प्रचंड रागावून रिक्त तळहात आपटतों.
ते आपले सगळे हवेंतल्या हवेंत चाललेले हावभाव.
ते पाहायला नि ऐकायला समोर कुणी नसतें;
आपण असतों आणि आपलें गमावणें असतें.
ईश्वर असला तरी तो तटस्थ असतो.
यालाच आंधळा, बहिरा आणि मुका ईश्वर
असें म्हटलें गेलें असेल. हरकत नाही. हें मत मान्य
किंवा अमान्य, कसेंहि नाही. कारण कीं कुठलींहि मतें,
कोणत्याहि विचारप्रणाली, सिद्धान्त, किंवा तत्सम प्रकार
यांना काही अर्थ नसतो. ते सारे भाषिक प्रकार.
मुक्या देवाच्या मौनाचा भाषेंत सांगितलेला गूढ अर्थ.
मी या मुक्याबहिऱ्या ईश्वराशी भांडत बसलों आहें.

हें खरें युद्ध. विराट पोकळींत चाललेला एकाकी थयथयाट.
तेव्हा आपण अत्यंत एकाकी असतों.
आपण आंधळे आहोंत, बहिरे आहोंत, मुके आहोंत
असें वाटत असतें.
मी अशा प्रकारची लढाई लढत इथे असा बसलों आहें.
देवाचें स्थान असावें तसें माझें हें स्थान आहे.
पाठीशीं स्मशान घेऊन अथांग समुद्राकडे पाहत
इथे मी निवांत बसलों आहें.

REFBK-0025557
REFBK-0025557